- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३२,३५० /-
✔ चांदी : १,९८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२१ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

भाजप-सेनेत 'ओपन वॉर' सुरूच

वृत्तसंस्था, मुंबई/पुणे

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमधील अंतर्गत मतभेद आणि वाद थेट चव्हाट्यावर आले आहेत. पुण्यात भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन आणि शिवसेना नेते व माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यात अत्यंत टोकाचे आणि वैयक्तिक पातळीवर वाक्युद्ध रंगले आहे. पदवीधर मतदारसंघात महायुतीच्या उमेदवाराचा गेम केल्याचा आरोप करत नवनाथ बन यांनी धंगेकरांवर माकडछाप अशी बोचरी टीका केली, तर धंगेकरांनी बन यांचा उल्लेख वशिला लावून आलेले पगारी पत्रकार असा करत पलटवार केला आहे. या वादामुळे भाजप-शिवसेना



युतीमधील समन्वय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर महायुतीमधील धुसफूस चव्हाट्यावर आली. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर यांच्यावर महायुतीविरोधी काम केल्याचे गंभीर आरोप केले. धंगेकर यांनी पदवीधर मतदारसंघात भाजप उमेदवाराला मतदान न करण्याचे आवाहन केले होते आणि भाजपचा पराभव झाल्यावर शाब्बास पदवीधरांनो अशी सोशल मीडिया पोस्ट केली, असा दावा बन यांनी केला.

यावरून बन यांनी धंगेकरांचा उल्लेख झारीतले शुक्राचार्य असा केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली. या टीकेला रवींद्र धंगेकर यांनीही अत्यंत आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले. त्यांनी बन यांचे सर्व आरोप बिनबुडाचे असल्याचे सांगत फेटाळून लावले. भाजपने नागपूर आणि पुण्यातील पराभवाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, महायुतीला सूज आली असून आता ऑपरेशनची गरज आहे असा टोला धंगेकरांनी लगावला.

१२ पक्ष फिरलेली माकडछाप व्यक्ती : बन

धंगेकरांनी आयुष्यभरात १२ पक्ष बदलले, पण त्यांना स्वतःचे राजकीय करिअर घडवता आले नाही. मित्र म्हणायचे आणि पाठीत खंजीर खुपसून भाजप उमेदवाराचा पराभव करायचा, हा धंगेकरांचा धंदा आहे.

वशिला लावून आलेले प्रवक्ते : धंगेकर

नवनाथ बन हे काही काळ पगारी पत्रकार होते, त्यांनी वशिला लावून भाजपचे मुख्य प्रवक्तेपद मिळवले आहे. पराभवाची जबाबदारी स्वीकारून पुण्यात आणि नागपुरात भाजपचा दारूण पराभव झाला आहे, त्याचे खापर दुस-यांवर फोडू नका असे धंगेकर म्हणाले.

युतीत दरी निर्माण होतेय : उदय सामंत

महायुतीमधील काही पदाधिकाऱ्यांकडून सातत्याने मित्रपक्षांविरोधात जाहीर वक्तव्ये केली जात आहेत, याबद्दल आम्ही आमची तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे युतीमध्ये दरी निर्माण होते. तिन्ही प्रमुख नेत्यांनी एकत्र बसून अशा लोकांचा बंदोबस्त केला पाहिजे आणि अंतर्गत समन्वय सुधारला पाहिजे.

तुझी लायकी किती ? : निलेश राणे

तुझी लायकी किती आणि तू बोलतो किती ? नवनाथ बन यांनी शिंदे साहेबांवर किंवा शिवसेनेवर बोलताना आपल्या लायकीत राहून बोलावे, असा थेट इशारा राणेंनी दिला. नवनाथ बन यांनी निलेश राणे माझे मित्र आहेत असे म्हटले होते. त्यावर पलटवार करताना राणे म्हणाले, तो काय माझा मित्रबित्र नाही, तो माझा ज्युनिअर आहे. मी २००९ मध्ये खासदार झालो, तेव्हा तो चड्डीत होता. मी कोणालाही मित्र बनवत नसतो.

सत्तेसाठी जमलेल्यांची हीच अवस्था होते : पेडणेकर

महायुतीमध्ये केवळ सत्तेसाठी आणि स्वार्थासाठी एकत्र आलेले लोक आहेत. त्यामुळे निवडणुकीत पराभव होताच हे एकमेकांचे कपडे टराटरा फाडायला निघाले आहेत. निलेश राणेंनी भाजपच्या मुख्य प्रवक्त्यांबद्दल ज्या भाषेचा वापर केला, त्यावरून महायुतीमध्ये एकमेकांबद्दल किती आदर आहे हे स्पष्ट होते. शिंदे गटाला सत्तेची मस्ती आली असून ते भाजपच्याच नेत्यांना आता लायकी दाखवायला निघाले आहेत.

थोडक्यात

ई केवायसी न झालेल्या लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळणार?

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेविषयी महत्त्वाची माहिती राज्यातील ८१ लाख लाडक्या बहि-णींना दिवाळी गिफ्ट मिळू शकते. काही कारणास्तव त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये आदिवासी आणि गरीब कुटुंबातील महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. या महिलांना लवकरच १५०० रुपयांचा सन्मानिधी मिळू शकतो. या महिलांना १५०० रुपयांचा हप्ता मिळवून देण्याची हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर कष्टकरी, शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना फडणवीस यांनी हे आश्वासन दिल्याची माहिती समोर येत आहे. अखिल भारतीय किसान सभेने कष्टकरी, शेतकरी यांचा न्याय मागण्यासाठी मोर्चा काढला. हा मोर्चा मुंबईकडे निघाला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळाला भेटीस बोलावले होते. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर शिष्टमंडळा सोबत साधकबाधक चर्चा झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पाच महत्त्वाच्या खात्याचे मंत्री हजर होते. तसेच विविध विभागाचे सचिवही उपस्थित होते.

निवासी 'नझुल' जमिनींसाठी 'विशेष अभय योजने'ला मुदतवाढ

नागपूर आणि अमरावती विभागातील जमीनाधारकांना दिलासा, फडणवीस सरकारचा निर्णय, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जारी केले निर्देश, फ्री-होल्ड, थकीत भाडे व शर्तभंग नियमितीकरण होणार

दे. सिंहवाणी वृत्त, मुंबई

नागपूर आणि अमरावती या दोन्ही विभागांतील निवासी नझुल जमिनींसंदर्भात राबविण्यात येत असलेल्या विशेष अभय योजना २०२४-२५ ला दि. १ ऑगस्ट २०२६ ते दि. ३१ जुलै २०२७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी आणि विविध कारणांमुळे ज्या भाडेपट्टेदारांना आतापर्यंत या अभय योजनेचा लाभ घेता आला नव्हता. याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर याबाबत आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून २०२४ मध्ये नझुल जमिनींसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. आता लोकांना पुन्हा एकदा संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

अभय योजनेतील प्रमुख तरतुदी आणि फायदे

२ टक्के अधिमूल्यावर जमीन फ्री-होल्ड

निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे भाडेतत्त्वावर दिलेल्या नझुल जमिनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्यासाठी प्रचलित वार्षिक दरसूचीतील (रेडी रेकनर) बाजारमूल्याच्या अवघ्या २ टक्के एवढे अधिमूल्य आकारले जाईल.

थकीत भाड्यावर ०.०२% सवलतीचा दर

अभय योजनेच्या कालावधीत थकीत भाडेपट्टयाची रक्कम ०.०२ % या सवलतीच्या दराने आकारली जाईल. मात्र, मुदत संपण्यापूर्वी (३१ जुलै २०२७) थकीत भू-भाडे न भरल्यास त्यानंतर थकीत रक्कमेवर वार्षिक १० टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल.

शर्तभंग नियमितीकरणासाठी १% अनर्जित रक्कम

नझुल जमिनींच्या बाबतीत झालेल्या शर्तभंग नियमिती करणाच्या प्रकरणांमध्ये, ज्या वर्षी शेवटचा शर्तभंग झाला असेल त्या वर्षाच्या वार्षिक दरसूचीनुसार बाजारमूल्याच्या १% दराने अनर्जित रक्कम आकारून शर्तभंग नियमित केला जाईल.

योजनेची मुदत व व्याप्ती

ही सुधारित योजना दि. १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०२७ या एका वर्षाच्या कालावधीसाठीच लागू असेल. विशेष अभय योजना संपल्यानंतर म्हणजेच १ ऑगस्ट २०२७ पासून पूर्वीचेच महसूल नियम लागू होतील.

११ जिल्ह्यांतील नागरिकांना लाभ

या निर्णयाचा फायदा विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि वाशीम या ११ जिल्ह्यांमधील निवासी नझुल जमिनींच्या हजारो धारकांना होणार आहे.

वाघांच्या हल्ल्यात दोन ठार

दे. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर

जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र झाला असून, शुक्रवारी एकाच दिवशी वाघांच्या हल्ल्यांच्या तीन घटना घडल्या. चिमूर वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर सिंदेवाही तालुक्यातील धुमणखेडा येथे वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. दुसरीकडे, पोंभुर्णा तालुक्यातील सातारा तुकूम परिसरात वाघाच्या हल्ल्यात गुराखी गंभीर जखमी झाला. या घटनांमुळे जिल्ह्यातील जंगलालगतच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

चिमूर उपक्षेत्रातील गदगाव नियतक्षेत्रात शुक्रवारी (३० ऑक्टोबर) दुपारी १.३० वाजताच्या सुमारास पहिली घटना घडली. सदाशिव चिरकटा खडसंग (५५, रा. गरडापार) हे शेताला लागून असलेल्या जंगल परिसरात शौचास गेले होते. वावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाला कळविण्यात आले. हा परिसर ब्रह्मपुरी वनविभागांतर्गत येतो.

दुसरीकडे, धुमणखेडा येथे वाघाच्या हल्ल्यात ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. पत्रु रामाजी मेश्राम (रा. धुमणखेडा) असे मृताचे नाव आहे. शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ही घटना उघडकीस आली. मेश्राम हे दुपारी दोनच्या सुमारास शेतातील धानपिकाची पाहणी करण्यासाठी गेले होते. सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांनी शोध सुरू केला. शेतात त्यांचा चष्मा, काठी, चप्पल आणि रक्ताचे डाग आढळले. वनविभागाच्या पथकाने शोध घेतला असता प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ त्यांचा मृतदेह आढळला. वाघाने त्यांना फरफटत नेऊन ठार केल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

बद्रीनाथजवळ ६ जणांना घेऊन जाणारे हेलिकॉप्टर कोसळले

वृत्तसंस्था, चमोली

उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यात बद्रीनाथवरून जोशीमठकडे जाणारे एक हेलिकॉप्टर अचानक कोसळल्याची घटना शुक्रवार दि. ३० ऑक्टोबर रोजी घडली आहे. या हेलिकॉप्टरमधून सहा जण प्रवास करत होते अशी माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. खराब हवामानामुळे हे हेलिकॉप्टर कोसळल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. या घटनेबाबत जिल्हा प्रशासनाने सांगितले की, त्यांना हेलिकॉप्टरचा संपर्क तुटल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, हे हेलिकॉप्टर नक्की कोसळलं आहे का? याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. तसेच हेलिकॉप्टरमध्ये नेमके कोण होतं आणि ही घटना कशी घडली? याबद्दलची सविस्तर माहिती देखील अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, जोशीमठ पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक मनोहर कन्याल यांच्या माहितीनुसार, दुपारी २:२१ वाजता जोशीमठच्या एसडीएमकडून अशी माहिती मिळाली की जोशीमठ परिसरातील चाई गावाच्या परिसरात एक हेलिकॉप्टर कोसळले (क्रॅश लँडिंग झाले). याबाबत पुढील माहिती घेतली जात असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



दरम्यान, या संदर्भात उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितलं की, ट्रान्स भारत कंपनीच्या एका हेलिकॉप्टरचे लोकेशन चाई गावाच्या भागात लष्करी तळाजवळ दिसून येत आहे. हे हेलिकॉप्टर बद्रीनाथवरून सहस्त्रधाराच्या दिशेने जात होते. दरम्यान, या हेलिकॉप्टरमध्ये पाच प्रवासी आणि एक वैमानिक असे एकूण सहा जण होते. मात्र, हेलिकॉप्टर नक्की कोसळलं आहे की आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं आहे? याबाबतची माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही. ही घटना घडल्यानंतर जोशीमठ आणि पांडुकेश्वर येथील एसडीआरएफची पथके संबंधित ठिकाणाच्या दिशेने रवाना झालेले आहेत असे वृत्तात म्हटले आहे.

हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना दुर्दैवी : मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी

या घटनेवर प्रतिक्रिया देताना उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी म्हटले की जोशीमठजवळील चाई गावाजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि एसडीआरएफ यांच्या संयुक्त विद्यमाने बचाव कार्य सुरू आहे. मी स्वतः संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तींना उपचारांसाठी तातडीने हवाई मार्गे हलवण्याचे निर्देश दिले आहेत. मी देवाकडे सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करतो असे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

नागपूरमधील गणेशपेठ परिसरात म्हाडाच्या इमारतीच्या बांधकामस्थळी भीषण अपघात; २ ठार, ४ जखमी







दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूरमधील गणेशपेठ परिसरात म्हाडाच्या इमारतीच्या बांधकामस्थळी भीषण अपघात झाला आहे. काम सुरू असताना सुमारे १०० फूट उंच क्रेनचा वरचा भाग अचानक तुटून खाली कोसळला. या दुर्घटनेत चार मजूर जखमी झाले होते. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला पोलीस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. तर अन्य दोघे जखमी असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. म्हाडाने काम शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले असून काम सुरू असताना हा अपघात घडलाय. सुमारे १०० फूट उंच असलेल्या क्रेनचा वरचा भाग तुटून कोसळला. क्रेन काम करत असताना कोसळल्याने क्रेनवर काम करणारे मजदूर अपघातावरून खाली पडले. जखमी ४ मजुरांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यापैकीच दोघेजण गंभीर असल्याची माहिती आहे.

या दुर्घटनेमुळे बांधकाम स्थळावरील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. क्रेन कोसळण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

दुष्काळग्रस्त भागासाठी सरकारची चारा खरेदी

मुंबई : राज्य सरकारकडून दुष्काग्रस्त भागातील पशुधनासाठी चारा खरेदी करण्यात येणार आहे. या चारा खरेदीचा दर सरकारने निश्चित केला असून सुका चारा आणि मुरघास यांच्या खरेदीसाठी अनुक्रमे प्रतिकिलो कमाल १२ रुपये आणि ८ रुपये अशी आधारभूत किंमत निश्चित करण्यात आली आहे. या दरांमध्ये वाहतूक खर्चाचा समावेश नसून तो स्वतंत्रपणे देण्यात येणार आहे. सन २०२६-२७ मधील दुष्काळाच्या कालावधीसाठी हे दर लागू राहणार आहेत. राज्यातील ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाने चारा खरेदीविषयी शासन निर्णय जारी केला आहे. या भागातील शेतकऱ्यांच्या पशुधनासाठी शासनाने चारा खरेदी करताना गुणवत्तेचे निकषही निश्चित केले आहेत. सुक्या चाऱ्यातील ओलाव्याचे प्रमाण कमाल १५ टक्के असावे. चारा चांगल्या दर्जाचा, आंबट किंवा कुबट वास नसलेला तसेच बुरशी, माती आणि किडींपासून मुक्त असणे आवश्यक आहे. सुक्या चाऱ्यासाठी ज्वारी आणि बाजरीला प्राधान्य देण्यात आले आहे. मुरघास खरेदी करताना तो हवाबंद अवस्थेत असणे आवश्यक आहे. त्याला बुरशीचा प्रादुर्भाव नसावा. मुरघासातील ओलाव्याचे प्रमाण ६२ ते ७० टक्के, सामू (पीएच) ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीनचे प्रमाण किमान नऊ टक्के असणे आवश्यक आहे. तसेच क्रूड फायबरचे प्रमाण कमाल ३५ टक्के किंवा एनडीएफचे प्रमाण ६० टक्के, अफ्लाटॉक्सिन बी कमाल २० पीपीबी असावे, आदी निकष जारी करण्यात आले आहेत.

संपादकीय लेखणीतून...

करार

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर आयात शुल्क लादणारे नवीन नियम तात्पुरते रद्द केले आहेत त्यामुळे भारत आणि चीनसारख्या देशांवर १०० टक्केपर्यंत शुल्क लादण्याचा धोका टळला आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्रीय हिताचा हवाला देत हा निर्णय घेतला; पण याचा अर्थ असा नाही की, रशियावरील अमेरिकेचे सर्व निर्बंध उठवले गेले आहेत. गरज भासल्यास हे नियम पुन्हा लागू करण्याचा अधिकारही ट्रम्प यांनी राखून ठेवला आहे. अमेरिकेला कोणतेही व्यापारी नुकसान होऊ नये, हे सुनिश्चित करण्यासाठी ट्रम्प या कायद्याद्वारे अनेक कठोर उपाययोजना करण्याची योजना आखत होते. या कायद्यानुसार रशियाकडून तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर पूर्ण १०० टक्के शुल्क लादले गेले असते. यामुळे रशियासोबत व्यापार करणाऱ्या देशांना मोठे आर्थिक नुकसान झाले असते. दिवंगत सिनेटर लिंडसे ग्रॅहम हे या कायद्याचे प्रमुख समर्थक होते.

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्यावर होणारी टीका आणि रशियासोबत अमेरिकेची वाढत चाललेली जवळीक या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी हा आदेश दिला आहे. अमेरिका आणि रशिया यांच्यातील जवळीक गेल्या काही काळापासून दिसून येत आहे. ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेन या दोन्ही देशांच्या प्रमुखांना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले आहे. या काळात त्यांनी दोन्ही देशांवर विविध प्रकारे दबाव आणला; पण ते युद्ध टाळू शकले नाहीत. एका कार्यकारी आदेशात ट्रम्प यांनी जाहीर केले की, ग्रॅहम कायद्यांतर्गत असलेले निर्बंध, प्रतिबंध आणि शुल्क यांना सूट देण्यात येईल. त्यांनी सांगितले की, काँग्रेसला एक प्रमाणपत्र सादर करण्यात आले असून, हे राष्ट्रीय हितासाठी उचललेले पाऊल असल्याचे म्हटले आहे. रशियासंबंधित शुल्कांवरील ही स्थगिती केवळ काही दिवसांपुरतीच असण्याची शक्यता आहे. अध्यक्ष ट्रम्प भविष्यात साधक-बाधक बाबींचा विचार करून हे निर्बंध लागू करू शकतात त्यामुळे त्यांच्या या ताज्या निर्देशामुळे ही स्थगिती दीर्घकाळ टिकेल की नाही याबद्दल शंका आहे. चीननंतर भारत हा रशियन कच्च्या तेलाचा दुसरा सर्वांत मोठा खरेदीदार आहे. ग्रॅहम कायद्याद्वारे, अमेरिका रशियावर कठोर निर्बंध लादू इच्छिते. या कायद्यानुसार रशियाकडून अतिरिक्त तेल खरेदी करणाऱ्या कोणत्याही देशाला आर्थिक निर्बंधांना सामोरे जावे लागेल. हे निर्बंध रशियाकडून तेल व वायू खरेदी करणाऱ्या पहिल्या ५ देशांना लागू होतील; पण जे देश त्यांच्या एकूण तेलाच्या गरजेपैकी केवळ १५ टक्के आयात करतात त्यांना सूट दिली जाईल. तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० ते ५०० टक्के शुल्क आकारले जाऊ शकते. अमेरिकेने पुढील महिन्यात होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय घेण्यात आला आहे. हा नवा कायदा लागू होऊन रशियन तेलाचा ओघ मोठ्या प्रमाणावर घटला असता तर अमेरिकेसह जगभरात आधीच वाढलेले इंधनाचे भाव आणखी भडकले असते. याचा थेट फटका आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला बसण्याची शक्यता होती म्हणूनच निवडणुकांआधी वाढत्या इंधन किमतींना लगाम घालण्यासाठी ट्रम्प सातत्याने पावले उचलत आहेत.

काही दिवसांपूर्वी रशियाकडून अमेरिका आणि इतर देशांना होणाऱ्या डिझेल निर्यातीवरचे निर्बंध उठवण्यासाठी झालेला करार हे याचेच एक उदाहरण आहे. या सवलतीमुळे रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर दंडात्मक कारवाई होण्याचा धोका सध्या तरी टळला आहे; मात्र याचा अर्थ अमेरिका भविष्यात भारतावर दबाव आणणारच नाही, असा होत नाही. ट्रम्प हे त्यांच्या लहरी स्वभावासाठी प्रसिद्ध आहेत त्यामुळे मध्यावधी निवडणुकांनंतर त्यांचं प्रशासन रशिया आणि युक्रेनच्या मुद्यावर काय भूमिका घेते ते पाहणे महत्त्वाचे आहे. भारत हा कच्चा तेलाचा जगातला तिसरा सर्वांत मोठा ग्राहक असून देशाची ८८ टक्क्यांहून अधिक गरज आयात तेल साठ्यांमधून भागवली जाते. रशिया हा भारताचा सर्वांत मोठा पुरवठादार देश आहे. सप्टेंबरमध्ये भारत रशियाकडून दररोज १९ लाख बॅरल कच्चा तेलाची आयात करत होता. हे प्रमाण त्या महिन्यातल्या भारताच्या एकूण तेल आयातीच्या ३५ टक्क्यांहून अधिक होते. त्या आधीच्या महिन्यातही आयात यापेक्षाही जास्त होती. जुलै महिन्यात भारताने दररोज २८ लाख बॅरल आयात करण्याची विक्रमी पातळी गाठली होती. ट्रम्प यांनी दिलेल्या सवलतीमुळे भारतासमोरचा पेच तूर्त तरी मिटला आहे.

भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार करारासाबत महत्त्वपूर्ण घडामोडी घडत आहेत. दोन्ही देश करारच्या अंतिम टप्प्याजवळ पोहोचल्याचे संकेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले आहेत. भारताला अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याची इच्छा असून आता होणारा करार हा या पूर्वी झालेल्या करारापेक्षा वेगळा असेल, असे ते म्हणाले. अमेरिकेचे पराष्ट्र सचिव मार्को रुबियो भारत दौऱ्यावर असून व्यापारासह ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण आणि दोन्ही देशातील नागरिकांमधील संबंध अधिक मजबूत करण्यावर चर्चा सुरू आहे. रुबियो यांनी मंगळवारी बोलताना करार अंतिम करण्यासाठी मोजकेच मुद्दे चर्चेसाठी शिल्लक असल्याचे सांगितले. उर्वरित प्रश्न लवकर सुटल्यास कराराची घोषणा होऊ शकते आणि त्यानंतर दोन्ही देशांचे नेते त्यावर स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांनी या महिन्याच्या सुरुवातीला मिलवॉकी आणि वॉशिंग्टन येथे अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांची भेट घेऊन करारातील विविध तरतुदींवर चर्चा केली होती. भारत आणि अमेरिकेने फेब्रुवारीमध्ये द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याच्या आराखड्याला अंतिम स्वरूप दिल्याची घोषणा केली होती; मात्र अमेरिकेच्या शुल्कविषयक धोरणांमध्ये झालेल्या बदलांमुळे पुढील वाटाघाटी कराव्या लागल्या. भारत-अमेरिकेतील करारासाबत दोन्ही बाजूंकडून सकारात्मक संकेत मिळत आहेत. भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी नवी दिल्लीतील ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलताना महत्त्वाचे मुद्दे मार्गी लागले असून करार लवकरच लागू करण्याच्या दिशेने दोन्ही देश पुढे जात असल्याचे सांगितले. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही चर्चेच्या निष्पत्तीबाबत आशावाद व्यक्त केला आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प प्रशासनाने रशियन निर्यातीशी संबंधित काही निर्बंध आणि शुल्क हटविण्याचा निर्णय घेत भारताला दिलासा दिला होता. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या कायद्यानुसार हे निर्बंध आणि शुल्क लागू होणार होते;भारताने आपल्या तेलाच्या स्रोतांमध्ये विविधता आणणे योग्य असल्याचे त्यांनी सांगितले. रशियाकडून होणाऱ्या तेल खरेदीबाबतही भारताच्या ऊर्जा गरजा लक्षात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी मान्य केले.

शिक्षित मतदार, अवैध मतदान : पदवीच्या पलीकडील मतदानविवेकाचे आव्हान !

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर होणारे अवैध (अवैध) मतदान हा सध्या चिंतेचा आणि चर्चेचा विषय बनला आहे. उच्चशिक्षित पदवीधर मतदारांकडून होणाऱ्या या चुकांमुळे त्यांच्या राजकीय सजगतेवर आणि मतदानविवेकावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत सुशिक्षित आणि उच्चशिक्षित मतदार असूनही मोठ्या प्रमाणावर मते अवैध ठरण्याचे मुख्य कारण म्हणजे मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदवताना झालेल्या तांत्रिक चुका आणि मतदान प्रक्रियेबाबतच्या जागरूकतेचा अभाव होय.

ऑक्टोबर २०२६ मध्ये झालेल्या महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीत (उदा. नागपूर पदवीधर मतदारसंघात १५,०३२ मते आणि पुणे पदवीधर मतदारसंघात १७,२९९ मते) प्रचंड संख्येने मते अवैध ठरली आहेत. सुशिक्षित मतदारांकडून झालेल्या या चुकांमुळे मतदारांच्या जागरूकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक ईव्हिएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे होते. यात उमेदवाराच्या नावापुढील चौकटीत '१', '२', '३' असा पसंतीक्रम लिहायचा असतो. अनेक मतदार '१' ऐवजी बरोबरची (?) किंवा फुलीची (.) खूण करतात, अथवा एकापेक्षा जास्त उमेदवारांना '१' हा पसंतीक्रम देतात, ज्यामुळे मत बाद होते.

पहिल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावापुढील चौकटीत स्पष्टपणे '१' हा अंक लिहायचा असतो. इतर उमेदवारांना तुमच्या आवडीनुसार २, ३, ४ असा पसंतीक्रम देता येत असतो,मात्र शिक्षित मतदारांनी इथ देखील चुका करून ठेवल्या.

पसंतीक्रम नोंदवताना केवळ आंतरराष्ट्रीय अंकात (1, 2, 3) किंवा देवनागरीत (१, २, ३) अंक लिहायाला पाहिजे असताना अनेक मतदारांनी क्रमांक शब्दात लिहिला त्यामुळे अनेकांची मते अवैध ठरली.. चौकटीत इतर कोणत्याही खुणा करू नये,असे स्पष्ट निर्देश असताना नेहमी प्रमाणे मतदारांनी चुका केल्या. मतपत्रिका ही केवळ पसंतीक्रम नोंदवण्यासाठी आहे. त्यावर स्वतःचे नाव, स्वाक्षरी, शेरे, कविता, तक्रारी किंवा राजकीय घोषणा लिहायचे नसतात.

मतदान केंद्रात मतपत्रिकेसोबत जो पेन दिला जातो त्याच पेनने अंक लिहायचा असतो

अंक चौकटीच्या आतच असावा लागतो. पसंतीक्रमाचा अंक लिहित असताना तो उमेदवाराच्या नावापुढील निश्चित केलेल्या चौकटीच्या रेषेला स्पर्श करणार नाही किंवा बाहेर जाणार नाही याची दक्षता घ्यायाला पाहिजे ,मात्र या सर्व नियमांचे पालन न केल्याने मते अवैध झाली.

निवडणूक नियमांनुसार, मतपत्रिकेवर नाव, स्वाक्षरी, घोषणा, राजकीय चिन्हे किंवा कोणताही संदेश लिहिल्यास मताची गोपनीयता भंग होते आणि ते मत थेट बाद (अवैध) ठरवले जाते. नुकत्याच झालेल्या मतमोजणीत अशा चुकांमुळे १६,००० पेक्षा जास्त मते अवैध ठरली आहेत. उच्च शिक्षण घेतले असले तरी प्रत्यक्ष मतदानाच्या तांत्रिक नियमांची माहिती अनेक मतदारांना नसते. समाजाला दिशा देणारा सुशिक्षित वर्गच जर मतदान प्रक्रियेत चुका करत असेल, तर त्यांच्या 'शिक्षित' असण्यावर प्रश्न निर्माण होतो. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सुशिक्षित वर्गाची सजगता आणि जबाबदारी सर्वात महत्त्वाची मानली जाते.

केवळ पदवी असणे म्हणजे व्यक्ती राजकीय किंवा सामाजिकदृष्ट्या परिपक्व आहे असे नाही.

अनेकदा उच्चशिक्षित लोकही उमेदवार किंवा पक्षाची धोरणे समजून घेण्याऐवजी वैयक्तिक जात, धर्म किंवा सोशल मीडियावरील अपप्रचाराला बळी पडतात.एका एका मताने उमेदवाराचे भवितव्य ठरत असताना, हजारो सुशिक्षित मते बाद झाल्याने योग्य लोकप्रतिनिधी निवडण्यात अडथळा येतो. अनेकदा बाद मतांची संख्या ही विजयी उमेदवाराच्या मताधिक्यापेक्षाही जास्त असते, ज्यामुळे निवडणुकीचा निकाल बदलू शकतो. थोडक्यात सांगायचे तर, शिक्षण हे फक्त उपजीविकेचे साधन न राहता, ते माणसाला एक सुजाण आणि जबाबदार नागरिक बनवणारे असावे. सुशिक्षित वर्गाने मतदानाचा हक्क गाजवताना अधिक प्रगल्भता दाखवली, तरच समाजाला योग्य दिशा मिळू शकेल.

- ९५६१५९४३०६

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये महिला पंचांचा ऐतिहासिक ठसा; किम कॉटन यांची कामगिरी ठरली मैलाचा दगड!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या मैदानावर फलंदाजांची फटकेबाजी, गोलंदाजांची आक्रमकता आणि क्षेत्ररक्षकांची चपळाई यांची नेहमीच चर्चा होते. मात्र, या खेळातील प्रत्येक निर्णयामागे नियमांचे अचूक ज्ञान, कमालीची एकाग्रता, प्रसंगावधान आणि दबावाखाली योग्य निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या पंचांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. क्रिकेटमध्ये दीर्घकाळ पुरुषांचे वर्चस्व राहिले असले, तरी आता महिला पंचांनीही आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर या क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

विशेषतः पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मैदानावर मुख्य पंच म्हणून जबाबदारी सांभाळणे, ही महिला पंचांसाठी केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून क्रिकेटमधील समान संधी आणि व्यावसायिक गुणवत्तेचे प्रतीक आहे. न्यूझीलंडच्या किम कॉटन यांनी ५ एप्रिल २०२३ रोजी पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये मैदानावरील पंच म्हणून इतिहास घडवला. त्यांच्या या कामगिरीने महिला पंचांसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील नव्या शक्यतांचे दरवाजे अधिक व्यापक केले. ही कामगिरी समजून घेताना क्लेअर पोलोसाक यांचे योगदान, भारतीय महिला पंचांचा प्रवास आणि पंचगिरीतील महिलांसमोरील आव्हाने यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

किम कॉटन यांचा ऐतिहासिक पराक्रम

५ एप्रिल २०२३ रोजी ड्युनेडिन येथील युनिव्हर्सिटी ओव्हल मैदानावर न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात तीन सामन्यांचा मालिकेतील दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळविण्यात आला. या सामन्यात न्यूझीलंडच्या किम कॉटन यांनी मैदानावरील पंच म्हणून काम पाहिले. आयसीसीच्या दोन पूर्ण सदस्य देशांमधील पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात मैदानावर पंचगिरी करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या. या ऐतिहासिक सामन्यात श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना १४१ धावा केल्या. न्यूझीलंडने हे लक्ष्य केवळ एका गड्याच्या मोबदल्यात पूर्ण केले आणि नऊ गडी राखून विजय मिळवला. अँडम मिल्नेने पाच बळी घेतले, तर टिम सायफर्टने नाबाद ७९ धावांची खेळी केली.



मात्र, सामन्याच्या निकालापेक्षा त्या दिवशी क्रिकेटच्या इतिहासात नोंदवली गेलेली किम कॉटन यांची कामगिरी अधिक काळ स्मरणात राहिली. पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात महिला पंचांची नियुक्ती होऊ शकते, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. कॉटन यांचा पुरुषांच्या क्रिकेटशी यापूर्वीही संबंध आला होता. २०२० मध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात त्यांनी तिसऱ्या पंचाची भूमिका बजावली होती. महिला क्रिकेटमध्येही त्यांनी एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामने तसेच विश्वचषकाच्या अंतिम सामन्यांत पंचगिरी केली होती.

क्लेअर पोलोसाक : पुरुषांच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिली महिला पंच

किम कॉटन यांच्या कामगिरीपूर्वी ऑस्ट्रेलियाच्या क्लेअर पोलोसाक यांनी पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इतिहास घडवला होता. २७ एप्रिल २०१९ रोजी नामिबियातील विंडहोक येथे ओमान आणि नामिबिया यांच्यात झालेल्या विश्व क्रिकेट लीग विभाग-दोन स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोलोसाक यांनी पंचगिरी केली. पुरुषांच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात मैदानावरील पंच म्हणून काम करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या. त्यांच्या या कामगिरीचे महत्त्व समजून घेण्यासाठी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल. ओमान आणि नामिबिया हे त्या वेळी पूर्ण सदस्य देश नव्हते; मात्र या सामन्याला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्याचा दर्जा होता. त्यामुळे पोलोसाक यांची कामगिरी आणि कॉटन यांची कामगिरी या दोन्ही ऐतिहासिक असल्या, तरी त्यांचे विक्रम वेगवेगळ्या स्वरूपाचे आहेत. पोलोसाक यांनी २०१७ मध्ये ऑस्ट्रेलियातील पुरुषांच्या देशांतर्गत सामन्यातही मैदानावरील पंच म्हणून काम पाहिले होते. त्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या संधीने त्यांच्या कारकिर्दीला नवी उंची मिळाली. त्यांचा प्रवास महिला पंचांसाठी एक महत्त्वाचा संदेश देतो : संधी मिळाली आणि कौशल्य सिद्ध केले, तर क्रिकेटच्या सर्वोच्च स्तरावरही महिलांना आपले स्थान निर्माण करता येते.

भारतीय महिला पंचांची रणजी करंडकात ऐतिहासिक झेप

आंतरराष्ट्रीय स्तरावरील या बदलांप्रमाणेच भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्येही महिला पंचांसाठी महत्त्वाचे दालन खुले झाले. जानेवारी २०२३ मध्ये वृंदा राठी, जननी नारायणन आणि गायत्री वेणुगोपालन या तीन भारतीय महिला पंचांनी रणजी करंडक स्पर्धेत मैदानावरील पंच म्हणून काम पाहिले. भारतीय पुरुषांच्या देशांतर्गत प्रथम श्रेणी क्रिकेटमधील हा ऐतिहासिक टप्पा होता. या तिघींच्या वाटचालीची पार्श्वभूमीही प्रेरणादायी आहे.

वृंदा राठी : मुंबईतील स्थानिक क्रिकेटमध्ये गुणलेखक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी पंचगिरीकडे वाटचाल केली. पुढे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या पंच परीक्षेत यश मिळवून त्यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपले स्थान निर्माण केले.

जननी नारायणन : माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकरी सोडून त्यांनी क्रिकेट पंचगिरीचा मार्ग स्वीकारला. क्रिकेटविषयीची आवड आणि नियमांचा सखोल अभ्यास यांमुळे त्यांना या क्षेत्रात प्रगती करता आली.

गायत्री वेणुगोपालन : क्रिकेटपटू होण्याचे स्वप्न दुखापतीमुळे अपूर्ण राहिले; मात्र त्यांनी खेळाशी असलेले नाते तोडले नाही. पंचगिरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी पुरुषांच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये ऐतिहासिक संधी मिळवली.

या तिघींच्या नियुक्त्या म्हणजे केवळ तीन महिलांना मिळालेली संधी नव्हती. पुरुषांच्या क्रिकेटमध्ये पंच म्हणून काम करण्यासाठी आवश्यक असलेले नियमज्ञान, निर्णयक्षमता आणि व्यावसायिक पात्रता या गोष्टी लिंगावर अवलंबून नसतात, हा विचार अधिक दृढ करणारा तो निर्णय होता.

पंचगिरी म्हणजे केवळ निर्णय देणे नव्हे!

क्रिकेटमध्ये पंचांची भूमिका अनेकदा प्रेक्षकांच्या नजरेतून सुटते. फलंदाज बाद आहे की नाही, चेंडू सीमारेषेपार गेला की नाही, गोलंदाजाने नियमांचे उल्लंघन केले का, चेंडू नो-बॉल आहे की नाही, यांसारखे निर्णय क्षणार्धात घ्यावे लागतात. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये या जबाबदारीचे गांभीर्य आणखी वाढते. खेळाडूंची आक्रमकता, प्रेक्षकांचा दबाव, सामन्याचे महत्त्व आणि प्रत्येक निर्णयाचे संभाव्य परिणाम यांचा विचार करता पंचगिरीसाठी प्रचंड मानसिक ताकद आवश्यक असते. पुरुषांच्या सामन्यांत महिला पंचांना काही अतिरिक्त सामाजिक अडथळ्यांनाही सामोरे जावे लागू शकते. सुरुवातीला खेळाडूंच्या मनात त्यांच्या क्षमतेबाबत प्रश्न निर्माण होणे, निर्णयांनंतर अधिक स्पष्टीकरणाची अपेक्षा ठेवली जाणे किंवा पुरुष पंचांच्या तुलनेत त्यांची अधिक कठोर परीक्षा घेणे, अशा परिस्थितींचा सामना करावा लागू शकतो. मात्र, पंचाचा निर्णय त्याच्या किंवा तिच्या लिंगावर नव्हे, तर क्रिकेटच्या नियमांवर आणि प्रत्यक्ष परिस्थितीच्या आकलनावर आधारित असतो. पंचाची खरी ओळख त्याच्या निर्णयांची अचूकता, सातत्य, आत्मविश्वास आणि निष्पक्षतेतून निर्माण होते.

महिला पंचांसाठी पुढील आव्हाने कोणती ?

महिला पंचांना मोठ्या स्पर्धांमध्ये संधी देणे ही सकारात्मक सुरुवात असली, तरी त्यांना नियमितपणे उच्चस्तरीय सामने मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. पहिले आव्हान म्हणजे संधींची सातत्यपूर्ण उपलब्धता. काही ऐतिहासिक सामन्यांमध्ये नियुक्ती मिळणे आणि नियमितपणे आंतरराष्ट्रीय सामने मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

दुसरे आव्हान म्हणजे प्रशिक्षण आणि गुणवत्ता टिकवणे. क्रिकेटचे नियम सतत विकसित होत असतात. निर्णय-पुनरावलोकन प्रणाली, तंत्रज्ञानाचा वापर, खेळाडूंच्या वर्तनाशी संबंधित नियम आणि सामन्याचे व्यवस्थापन यांचा सातत्याने अभ्यास करावा लागतो.

तिसरे आव्हान म्हणजे समान निकषांवर मूल्यमापन. महिला आणि पुरुष पंचांचे मूल्यमापन समान व्यावसायिक निकषांनुसार व्हायला हवे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचांना त्यांच्या गुणवत्तेनुसार अधिक महत्त्वाच्या सामन्यांमध्ये संधी मिळाली पाहिजे.

चौथे आव्हान म्हणजे नव्या पिढीला प्रेरणा. स्थानिक क्रिकेटपासून राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्पर्धांपर्यंत महिला पंचांना प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि अनुभव मिळाला, तर आंतरराष्ट्रीय स्तरासाठी अधिक सक्षम मनुष्यबळ तयार होऊ शकते.

महिला पंचांच्या प्रगतीचा क्रिकेटला काय फायदा ?

महिला पंचांच्या सहभागामुळे क्रिकेट अधिक समावेशक बनते. खेळाडू, प्रशिक्षक, पंच, सामनाधिकारी आणि प्रशासक अशा सर्व स्तरांवर महिलांना संधी मिळाल्यास खेळाच्या विकासाला नवी दिशा मिळते. महिला पंचांची उपस्थिती तरुण मुलींना क्रिकेटमध्ये करिअर करण्यासाठी एक वेगळा मार्ग दाखवते. प्रत्येक खेळाडूला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू होता येईलच असे नाही; परंतु पंचगिरी, प्रशिक्षकपद, गुणलेखन आणि सामनाव्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांतून क्रिकेटशी जोडले राहता येते. यामुळे क्रिकेटमधील प्रतिभेचा अधिक व्यापक वापर होतो. तसेच, पंचगिरी हे केवळ पुरुषांचे क्षेत्र आहे, ही जुनी धारणा बदलण्यास मदत मिळते.

निष्कर्ष : इतिहास घडविण्यापलीकडे समानतेचा प्रवास

किम कॉटन यांनी ५ एप्रिल २०२३ रोजी मिळवलेली ऐतिहासिक उपलब्धी, क्लेअर पोलोसाक यांनी २०१९ मध्ये पुरुषांच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यात केलेली पंचगिरी आणि भारतातील वृंदा राठी, जननी नारायणन व गायत्री वेणुगोपालन यांची रणजी करंडकातील कामगिरी या सर्व घटना क्रिकेटमधील परिवर्तनाच्या महत्त्वाच्या पायऱ्या आहेत.

या कामगिरींकडे केवळ महिला पंचांच्या विक्रमांच्या दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे ठरणार नाही. त्या क्रिकेटच्या व्यावसायिक क्षेत्रात समान संधी, कौशल्याला प्राधान्य आणि जुन्या रूढींना आव्हान देण्याच्या व्यापक प्रक्रियेचे प्रतीक आहेत. क्रिकेटच्या मैदानावर पंचाचा निर्णय महत्त्वाचा असतो; पंच स्त्री आहे की पुरुष, हे नव्हे. गुणवत्तेला संधी आणि संधीला न्याय मिळाला, तर क्रिकेटच्या मैदानावर आणखी अनेक महिला नवे इतिहास घडवू शकतील.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

पाणीटंचाई निवारणासाठी उपाययोजनांना गती द्या !

निधीची कमतरता भासू देणार नाही, प्रलंबित कामे मार्चपर्यंत पूर्ण करा, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश, जिल्हास्तरीय पाणीटंचाई बैठकीत विविध विभागांचा आढावा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून आतापासूनच काही भागांत पाणीटंचाई जाणवू लागली आहे. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन करून दीर्घकालीन उपाययोजना हाती घ्याव्यात. पाणीपुरवठा योजनांसह अन्य आवश्यक कामांना गती देऊन सर्व प्रलंबित कामे येत्या मार्चपर्यंत पूर्ण करावीत. या कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित जिल्हास्तरीय पाणीटंचाई आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यातील सुमारे ८५० गावांमध्ये डिसेंबर ते मार्च या कालावधीत भूजल पातळीत घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य परिस्थितीचा विचार करून संबंधित विभागांनी आतापासूनच उपाययोजनांचे नियोजन करावे. विभागांतर्गत प्रलंबित असलेल्या कामांना प्राधान्याने गती द्यावी. ज्या कामांना अद्याप प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही त्यांचे आराखडे तयार करून तातडीने मान्यता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

जलसंधारणाच्या कामांवर विशेष भर

पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, तलावांचे खोलीकरण आणि गावनिहाय जलधारा योजना राबविण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यासाठी १०० रिचार्ज पीट मंजूर करण्यात आले असून, पहिल्या टप्प्यात ५० रिचार्ज पीट तयार करण्यात येणार आहेत. यासाठी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन प्रत्येक गावात नियोजन करावे.

भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी वनराई बंधारे बांधण्याचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. यापूर्वी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांची माहिती सादर करून चालू वर्षातील प्रस्तावित बंधाऱ्यांचे नियोजन करावे. तसेच वॉटर हार्वेस्टिंग आणि विहीर पुनर्भरणाची कामेही हाती घ्यावीत. या सर्व कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

पाणीपुरवठा योजनांची कामे कालमर्यादेत पूर्ण करा

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रलंबित कामे निर्धारित कालमर्यादित पूर्ण करावीत. जलवाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेऊन पूर्ण करावीत. पोखरा योजनेंतर्गत गावांमधील कामे तसेच मृद व जलसंधारण विभागाची कामेही नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी नियोजन

संभाव्य दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने चारा उपलब्धतेबाबत उपाययोजना केल्या आहेत. यामुळे पशुपालकांना दर्जेदार व सुरक्षित चारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. पशुसंवर्धन विभागाने चारा लागवडीसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांची यादी तयार करून शासनाच्या अटी व शर्तीनुसार मंजुरी द्यावी. यासाठी कृषी सहाय्यकांची मदत घ्यावी. शेतकऱ्यांना चारा खरेदी करता येईल, या दृष्टीनेही आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. बैठकीत पाणलोट, सिंचन, जलसंधारण, कृषी, वनराई बंधारे, लघुसिंचन, पोखरा योजना, जलजीवन मिशन, पशुसंवर्धन आणि विद्युत विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला.

थोडक्यात

केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे अंजली तागडे हिचा प्रथम क्रमांक



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

जिल्हा परिषद, नागपूर यांच्या वतीने आयोजित माझा आवाज केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे नुकतेच आयोजन स्व. वामनरावजी मानकर हायस्कूल, खामली येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकलेला वाव मिळावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, विचार मांडण्याची क्षमता विकसित व्हावी तसेच भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश होता.

या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी संजय चिखले विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, काटोल हे होते. कार्यक्रमाचे आयोजक म्हणून येनवा केंद्राचे केंद्रप्रमुख धर्मपाल बागडे यांनी जबाबदारी सांभाळली. प्रमुख पाहुणा म्हणून स्व. वामनरावजी मानकर हायस्कूल, खामली येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा शारदाताई केने उपस्थित होत्या. तसेच स्व. वामनरावजी मानकर हायस्कूल, खामलीचे मुख्याध्यापक विष्णू गोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येणवा शाळेतील अंजली सेवाकर तागडे हिचा प्रथम क्रमांक आला. तिच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती,येणवा अध्यक्ष हेमराज सातपुते यांनी अभिनंदन केले.

नबीरा महाविद्यालय, काटोलच्या निधी तरटेची जिल्हास्तरीय आविष्कार २०२६ मध्ये चमकदार कामगिरी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे होणाऱ्या दुसऱ्या फेरीसाठी निवड



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

नबीरा महाविद्यालय, काटोलसाठी हा एक अभिमानाचा क्षण आहे, कारण कु. निधी तरटे हिने अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम येथे आयोजित नागपूर ग्रामीण मधील जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन संमेलन-२०२६ मध्ये वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा या श्रेणीत तृतीय पारितोषिक पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीत भर घालत, तिची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे होणाऱ्या अविष्कार संशोधन संमेलनाच्या दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली आहे. ही उत्कृष्ट कामगिरी तिचे समर्पण, कठोर परिश्रम, संशोधनाची आवड, नाविन्यपूर्ण विचार आणि शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेली तिची वचनबद्धता दर्शवते. तिच्या यशामुळे संस्थेला प्रचंड अभिमान आहे आणि सहकारी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी, त्यांच्या संशोधनातील आवडीचे विषय शोधण्यासाठी आणि संशोधन-आधारित उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळेल.

हे यश शिक्षण प्रसारक मंडळ, काटोलचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि अविष्कार समितीचे समन्वयक व सदस्य यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे आणि प्रोत्साहनामुळे शक्य झाले, ज्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी आणि संशोधन व नवोपक्रमासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या सततच्या पाठिंब्याने आणि सांघिक कार्यामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक शैक्षणिक व्यासपीठांवर आपली प्रतिभा दाखवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नबीरा महाविद्यालय, काटोलचे व्यवस्थापन, प्राचार्य, कर्मचारी आणि अविष्कार समितीचे समन्वयक व सदस्य यांनी कु. निधी तरटे यांचे या योग्य यशाबद्दल अतिशय मनपूर्वक अभिनंदन केले आणि ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ,नागपूर येथे होणाऱ्या आगामी फेरीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. हे यश तिच्या शैक्षणिक आणि संशोधन प्रवासातील अनेक टप्प्यांची सुरुवात ठरेल आणि संस्थेसाठी आणखी गौरव मिळवून देवो हिच सदिच्छा सर्वांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सुवर्ण पदक व राष्ट्रीय स्तरावर निवड

हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयाचा विद्यार्थी पियुष गोमासेचा सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सुवर्ण पदक व राष्ट्रीय स्तरावर निवड हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयाचा विद्यार्थी पियुष गोमासेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ बॉक्सिंग (पुरुष) वर्गात आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये हजरत बाबा ताजुद्दीन कला वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ उमरेड रोड नागपूर येथील बि.ए भाग १ चा विद्यार्थी पियुष मोरेश्वर गोमासे, या स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतून विद्यार्थी सहभागी झालेले होते. या स्पर्धेत हजरत बाबा ताजुद्दीन कला वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ, उमरेड रोड नागपूर येथील विद्यार्थी पियुष मोरेश्वर गोमासे या विद्यार्थ्याला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले. त्याची राष्ट्रिय स्तरावर निवड झालेली आहे. हा विद्यार्थी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बॉक्सिंग स्पर्धेचे राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणार आहे. राष्ट्रिय बॉक्सिंग स्पर्धा नोएडा, नवी दिल्ली येथे होणार आहे.

या विद्यार्थ्याला सुवर्ण पदक व राष्ट्रिय स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल विद्यापीठाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यासोबतच हजरत बाबा ताजुद्दीन कला वाणिज्य महाविद्यालय ताजाबाद शरीफ, उमरेड रोड नागपूर या विद्यार्थ्याचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात शादाब एज्युकेशन सोसायटी नागपूरचे अध्यक्ष अब्दुल सलीम अब्दुल जब्बार, संस्थेचे सचिव मोहम्मद शादाब अब्दुल सलीम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शकील सत्तार, डॉ. विरेंद्र आदमने, डॉ. सुभाष धोटे, डॉ. सुरेश काळे, डॉ. मिनाक्षी इंगळे, डॉ. विनोद शेंडे, डॉ. नामदेव मोरे, डॉ. समीर बडगुजर, प्रा.अर्पित थुल, प्रा. राहूल डेंगे, प्रा. अंकीत मेटांगे, प्रा. किरण हटवार, प्रा. प्रांजली हाडगे, प्रा.तनवीर खान या सर्वांनी सत्कार व अभिनंदन केले व राष्ट्रिय स्तरावर सुद्धा यश प्राप्त होवो यासाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

श्रवणयंत्र देत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी जपली सामाजिक बांधिलकी



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक : महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी नवरगाव, ता. रामटेक येथील प्रेमदास सोनबा वाढई यांना ऐकण्यास अडचण येत असल्याने श्रवणयंत्र प्रदान करण्यात आले. यावेळी स्नेहसदन शाळेचे मुख्याध्यापक पंकज पांडे उपस्थित होते. समाजातील गरजू व्यक्तींना आधार देणे, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे, हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी आहे, असे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावेळी सांगितले.

बहादुऱ्यात अभिजित वंजारी यांच्या विजयाचा जल्लोष

काँग्रेस जिंदा थी.. जिंदा है.. जिंदा रहेगी.. कैसे हरायाच्या घोषणा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अभिजित वंजारी यांच्या विजयाचा प्रीतम कापसे सोशल फाऊंडेशन व बहादुरा काँग्रेस च्या वतीने खरबी चौक येथे गुलाल उधळून, ढोल ताशाच्या गजरात व अतिशाबाजी करत जल्लोष करण्यात आला.

सायंकाळी ६ वाजता पूजा प्रीतम कापसे यांच्या नेतृत्वात सर्व बहादुरा काँग्रेस चे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते व नागरिक तसेच नगरसेविका मोठ्या संख्येने जमा होऊन जल्लोष साजरा केला या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयजयकार करीत



काँग्रेस जिंदा थी जिंदा है और जिंदा रहेगी... कैसे हराया अशा घोषणांनी सर्वांचे लक्ष वेधले. खरबी चौक ते बहादुरा फाटा पर्यंत वाहनांनी मिरवणूक काढून बहादुरा फाटा येथे सुद्धा घोषणा अतिशबाजी, गुलाल उधळून ढोल ताशाच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला विशेष राजू रहांगडाले यांच्या कैसे हराया या घोषणेने सर्व वातावरण आनंदमय झाले.

याप्रसंगी पूजा कापसे, प्रीतम कापसे बहादुरा नगरपंचायत च्या नगरसेविका किरण मुहुर्ले,अमिषा उके यांनी सर्वांना शुभेच्या देत हा विजय पदवीधरांचा, कार्यकर्त्यांचा व लोकशाहीचा आल्याचे वक्तव केले. विजय जल्लोषात पूजा प्रितम कापसे, प्रीतम कापसे, नगरसेविका अमिषा सचिन उके, नगरसेविका किरण अभिषेक माहूरे, आश्मीर खान, जावेद शेख, गोपाल वधेर्वार, शंकर गावंडे, विनोद बारहाते, राजू रहांगडाले, ज्ञानेश्वर मिरे, श्रद्धा कोरे, रिंकी तिवारी, संगीता नरड, अनुप फुलझले, सुमेध नगराळे, विनय फुलझेले, वर्षा झंझाड, उषा देशमुख, निलेश कळंबे, पिंटू भुसारी, प्रकाश डेरे पाटील, शेखर टाले, कृष्णा जाधव, जावेद भाई, इम्रान भाई, साहिल शेख, आतिष गोंडाने, सागर गुरव, इस्माईल शेख, रहीम खान, अमन ठाकूर, मीना अनिल नाकडे, जमील शेख, पिंटू बागडे, राजू काटोले, शंकर धनविजय, शुभम हुके यांच्यासह बहादुरा परिसरातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महावितरणच्या विकासकामांना वेग, नोव्हेंबर अखेर सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरणच्या नागपूर व गोंदिया परिमंडलातील वीज ग्राहकांना अधिक दर्जेदार, विनाखंड व भरवशाचा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना आता वेग आला आहे. आरडीएसएस वाहिनी विलगीकरण (फिडर सेपरेशन), मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि एडीबी अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या प्रगतीचा सर्वसमावेशक आढावा घेण्यासाठी नागपूर परिमंडल कार्यालयात उच्चस्तरीय बैठक नुकतीच पार पडली.

मुख्य अभियंता (प्रकल्प) संतोष सांगळे आणि नागपूर परिमंडलाचे



महावितरणमध्ये सुरु असलेल्या विविध विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेतांना मुख्य अभियंता संतोष सांगळे व राजेश नाईक

मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत या बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या बैठकीस नागपूर व गोंदिया मंडळाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उपकार्यकारी अभियंता हकआण्य प्रणालीद्वारे (व्हीसी) सहभागी झाले होते, तर अधीक्षक अभियंता (पायाभुत आराखडा) दिपाली माडेलवार यांचेसह अतिरिक्त कार्यकारी अभियंता कल्याणी निमकर, उपकार्यकारी अभियंता व सहायक अभियंता (पायाभूत आराखडा) यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा सविस्तर अहवाल सादर केला. कृषी वाहिन्यांचे विलगीकरण आणि ग्राहकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत, मुख्य अभियंत्यांनी सर्व यंत्रणांना विहित मुदतीत कामे पूर्ण करण्याचे अत्यंत कडक व स्पष्ट निर्देश दिले. पूर्ण झालेल्या वीजवाहिन्यांवर साहित्याची चोरी रोखण्यासाठी योग्य कायदेशीर परवानगी घेऊन त्या तत्काळ अंशतः चार्ज करण्यात याव्यात. तसेच, मार्ग अधिकार संदर्भातील प्रलंबित प्रश्न पुढील एक-दोन दिवसांत परस्पर समन्वयाने प्राधान्याने मार्गी लावावेत. ज्या ठिकाणी स्थानिक स्तरावर कामात अडथळे किंवा विरोध निर्माण होईल, तिथे तातडीने अधिकृत प्रोटोकॉलचा प्रभावी अवलंब करून कामे पूर्ण करावीत. आपल्या शेतकरी बांधवांना दिवसा अखंडित, नियमित व शाश्वत वीजपुरवठा मिळण्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, अशा सक्त सूचना देण्यात आल्या. पूर्ण झालेल्या वाहिन्यांचे त्वरित कार्यान्वयन (कमिशनिंग) करण्यासाठी आणि ज्या प्रकल्पांची प्रगती ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे अशा प्रत्येक ठिकाणी तातडीने अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करून सर्व अपूर्ण कामे नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. नव्याने कार्यान्वित होणाऱ्या मालमत्तांचे जिओ-टॅगिंग ताकाळ पूर्ण करावे तसेच भौतिक व आर्थिक प्रगतीचा अचूक ताळमेळ राखण्यासाठी सिंगल लाइन डायग्राम आणि पोल शेड्युल सादर करावेत. प्रोजेक्ट मॅनेजमेंट एजन्सीने निर्देशानुसार आणलेल्या सर्व त्रुटींची त्वरित पूर्तता करण्याचे आदेश देण्यात आले.

याशिवाय, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत शहरात प्रस्तावित असलेली ३ नवीन उपकेंद्रे आगामी नोव्हेंबर महिन्यातच न चुकता कार्यान्वित करावीत. आगामी रब्बी हंगामातील विजेचा वाढता डिमांड व ग्राहकांची गरज लक्षात घेता, एडीबी योजनेअंतर्गत 'न्यू दिल्ली उपकेंद्र' आणि 'अतिरिक्त पॉवर ट्रांसफॉर्मर'ची कामे युद्धपातळीवर सुरू करून ठरलेल्या टप्पाटप्याने वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले.

नागपूर व गोंदिया परिमंडलातील सर्वसामान्य वीज ग्राहकांना अधिक सक्षम, उच्चगुणवत्तेचा आणि अखंडित वीजपुरवठा देण्याकरिता महावितरण कटिबद्ध असून, ही सर्व कामे नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना या बैठकीत करण्यात आल्या.

प्रभाकर रानडे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सीताबर्डी मोदी नंबर २ येथील, जुने रहिवासी प्रभाकर उर्फ मोहन रानडे यांचे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, व एक मुलगी, असा बराच मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कार मोक्षधाम घाट येथे करण्यात आला.

पार्वताबाई ठाकरे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

पार्वताबाइ ठाकरे माजी सरपंच गट ग्रा. पं. आंबोली (पीराया) यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी निधन झाले. त्यांचेवर अंतिम ३१/१०/२०२६ ला सकाळी ११ वाजता स्मशानभूमी पिराया आंबोली, ता. उमरेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल.

हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांनी बोलावली फायनान्स कंपन्यांची बैठक

हिंगोली : कर्जबाजारीमुळे आणि फायनान्स कंपन्यांच्या तगाद्याला कंटाळून वागजळी (ता. हिंगोली) येथील काही महिलांनी आपली घरे विक्रीस काढल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून या प्रकरणाची गंभीर दखल हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतली आहे. या समस्येवर मार्ग काढण्यासाठी त्यांनी येत्या सोमवार दि. २ नोव्हेंबर रोजी संबंधित फायनान्स कंपन्यांच्या प्रतिनिधींची तातडीची बैठक बोलावली आहे.

थोडक्यात

जप्ती वॉरंटचा धाक दाखवून अवैध वसुलीचा आरोप; मनपा अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची दुकानदार संघटनेची मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पुनर्वसन योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या ८४ दुकानगाळ्यांच्या मालमत्ता कर वसुलीवरून नागपूर महानगरपालिका आणि आयुर्वेदिक चिल्लर दुकानदार कल्याणकारी संस्थेमध्ये वाद निर्माण झाला आहे. समान आकाराच्या दुकानगाळ्यांसाठी वेगवेगळ्या रकमेच्या डिमांड नोटीस देऊन जप्ती वॉरंटचा धाक दाखवत अवैध वसुली केल्याचा आरोप संस्थेचे अध्यक्ष अखिलेश मदने व सचिव दिलीप कोल्हे यांनी केला आहे. मालमत्ता कर कोणी भरावा, याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असतानाही मनपा अधिकाऱ्यांनी दुकानदारांवर वसुलीसाठी दबाव आणल्याचा आरोप संस्थेने केला आहे. या कारवाईविरोधात २९ सप्टेंबर रोजी मनपाकडे अपील दाखल करूनही त्यावर निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे संस्थेने ७ ऑक्टोबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली आहे.

न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असतानाही धनादेश वठविण्याची व कारवाई करण्याची धमकी दिली जात असल्याचा दावा संस्थेने केला आहे. या प्रकरणी उपायुक्त मिलिंद मेश्राम, तत्कालीन सहायक आयुक्त रायबोले, नरेंद्र बोरकर, सचिन मेश्राम आणि संजय कापगते यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ अंतर्गत गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मदने व कोल्हे यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी अशोक आसरे, असलम खान पठाण, राजू खान पठाण, विनोद घोलपे, हरीभाऊ दुरुगकर, रामदास शाहू यांच्यासह अनेक दुकानदार उपस्थित होते.

जीवन विकास विद्यालयाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड!

विभागीय मैदानी स्पर्धेत विविध वयोगटांत उल्लेखनीय यश, पाच खेळाडूंनी पटकावले प्रथम क्रमांक



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

क्रीडा क्षेत्रातील उज्वल परंपरा कायम राखत उमरेड येथील जीवन विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल तसेच विसापूर, बल्लारपूर येथील तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या स्पर्धांमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांत यश संपादन केले. यातील काही खेळाडूंनी प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात सम्मेद बालचंद्र मेश्राम याने ३००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे मुंबई-पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. याच गटात नील चेतन पाटील याने बांबू उडी प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात अक्षरा भिकुजी गायकवाड हिनेही बांबू उडीमध्ये तृतीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षाखालील मुलांच्या गटात अमन गणेश हवेलीकर याने बांबू उडी प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला. मुलींच्या गटात श्रावणी किशोर गवरी हिने बांबू उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. याच गटात मुस्कान सुधाकर सहारे हिने तृतीय क्रमांक पटकावला. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात वीर विजय भोसकर याने ६०० मीटर धावण्याच्या चुरशीच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली. या सर्व खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा प्रशिक्षक उमेश मोहोड यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. नियमित सराव, तांत्रिक प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे यश मिळाल्याचे सांगण्यात आले. खेळाडूंच्या या यशाबद्दल जीवन विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी वस्त्रोद्योग मंत्री श्रावणजी पराते, उपाध्यक्ष सुरेश झुरमुरे, सचिव प्रशांत सपाटे, सहसचिव बा. रा. बोकडे, संचालक मंडळाचे सदस्य अजय घाटे, केशव माणूसमारे, प्रकाश तोवर व नरेंद्र पटेल यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक दिनेश चुरहे, उपप्राचार्य जगदीश लडके, उपमुख्याध्यापक पांडुरंग चौधरी, पर्यवेक्षक विशाल बंड, संजय दाढे, स्वप्नील गवळी, आशिष तिडके यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडू आणि प्रशिक्षक उमेश मोहोड यांचे कौतुक केले. आगामी राज्यस्तरीय स्पर्धा १७ वर्षाखालील गटासाठी मुंबई-पालघर येथे, तर १९ वर्षाखालील गटासाठी डेरवण, चिपळूण,रत्नागिरी येथे होणार आहेत. या स्पर्धांमध्येही विद्यालयाचे खेळाडू यशाची परंपरा कायम राखतील, असा विश्वास व्यक्त करीत संस्थेच्या वतीने त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

भूमिगत वीजवाहिनी स्थलांतरित करण्यासाठी शनिवारी महाल परिसरात वीजपुरवठा बंद

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासकामांना सहकार्य करताना वीजपुरवठा यंत्रणेची सुरक्षितता आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तहसील मस्जिद परिसरातील तुळशीबाग रोड येथे नवीन रस्त्याचे काम सुरू असून, या कामाच्या अनुषंगाने महावितरणकडून भूमिगत वीजवाहिनीचे स्थलांतर करण्यात येणार आहे. मॉडेल मिल उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही महाल १ या वीजवाहिनीची भूमिगत केबल स्थलांतरित करण्याचे काम शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी हाती घेण्यात येणार आहे. हे काम सकाळी ८ ते ११.३० या वेळेत नियोजित करण्यात आले आहे.

नरखेडच्या शेतकऱ्यांच्या दोन ज्वलंत प्रश्नांना डॉ. अमोल देशमुख यांच्या पुढाकाराने गती!

रेल्वे बॅरिकेटिंग हटविण्याबाबत प्रशासनाचे सकारात्मक आश्वासन; बोअरवेल फ्लशिंग व विहीर साफसफाईसाठी परवानगीचा मार्ग मोकळा, चार महिन्यांपासून शेतकऱ्यांची अडवणूक संपण्याची आशा; रेल्वे प्रशासनाकडून ४ नोव्हेंबरला प्रत्यक्ष पाहणी, जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रामुळे जलस्रोतांच्या दुरुस्तीचाही प्रश्न मार्गी लागणार

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या दोन महत्त्वाच्या प्रश्नांना अखेर गती मिळाली आहे. रेल्वे मार्गावरील बॅरिकेटिंगमुळे शेतात जाण्या-येण्यासाठी निर्माण झालेली अडचण आणि बोअरवेल फ्लशिंग तसेच विहिरींच्या साफसफाईसाठी परवानगी मिळण्याचा प्रश्न डॉ. अमोल बाबू देशमुख यांच्या पुढाकाराने मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. या दोन्ही विषयांवर संबंधित प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

चार महिन्यांपासून शेतकऱ्यांचा रस्ता बंद; रेल्वे प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासन

नरखेड-गोंडेगाव रेल्वे मार्गावरील रेल्वे प्रशासनाने उभारलेल्या बॅरिकेटिंगमुळे



परिसरातील शेतकऱ्यांना मागील चार महिन्यांपासून मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. शेतात जाण्याचा पारंपरिक मार्ग बंद झाल्याने शेतकऱ्यांची ये-जा, शेतीची जमा तसेच शेतीशी संबंधित दैनंदिन व्यवहार प्रभावित झाले होते. विशेषतः शेतीच्या हंगामात या अडथळ्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली होती.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत डॉ. अमोल बाबू देशमुख यांनी पुढाकार घेऊन रेल्वे प्रशासनासोबत बैठक घेतली. बैठकीत शेतकऱ्यांच्या अडचणी आणि प्रत्यक्ष परिस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. यावेळी रेल्वे प्रशासनाकडून बॅरिकेटिंग खुले करण्याबाबत सकारात्मक आश्वासन देण्यात आले.

याच अनुषंगाने ४ नोव्हेंबर रोजी विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित रेल्वे साईट कार्यालयाच्या माध्यमातून प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना ये-जा करण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. त्यामुळे चार महिन्यांपासून बंदिस्त परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बोअरवेल फ्लशिंग आणि विहीर स्वच्छतेचा प्रश्नही मार्गी

नरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर दुसरी मोठी समस्या बोअरवेल फ्लशिंग, बोअरवेल साफसफाई आणि विहिरींमधील दगड, वाळू व गाळ काढण्याच्या कामांबाबतची होती. शासनाच्या निर्बंधांमुळे अनेक शेतकऱ्यांना आपल्या विहिरी आणि बोअरवेलची दुरुस्ती व स्वच्छता करणे शक्य होत नव्हते. परिणामी उपलब्ध जलस्रोतांचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यास अडचणी निर्माण होत होत्या.

विशेषतः पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बंद पडलेल्या किंवा गाळ साचलेल्या विहिरींची स्वच्छता करणे आणि बोअरवेलचे फ्लशिंग करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक झाले होते. मात्र परवानगीअभावी ही कामे रखडली होती.

या प्रश्नावरही डॉ. अमोल बाबू देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांनंतर नागपूरचे जिल्हाधिकारी यांनी काटोल उपविभागीय अधिकारी यांना पत्र पाठवून संबंधित कामांसाठी नियमानुसार परवानगी देण्याच्या प्रक्रियेबाबत निर्देशित केले आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत आवश्यक परवानगी घेऊन बोअरवेल फ्लशिंग, साफसफाई तसेच विहिरीतील दगड, वाळू व गाळ काढण्याची कामे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाच्या दारात सातत्यपूर्ण पाठपुरावा

शेती हा नरखेड तालुक्यातील बहुतांश नागरिकांच्या उपजीविकेचा प्रमुख आधार आहे. अशा परिस्थितीत शेतात जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसणे किंवा उपलब्ध जलस्रोतांची दुरुस्ती करता न येणे, या दोन्ही समस्या शेतकऱ्यांसाठी गंभीर स्वरूपाच्या होत्या. या प्रश्नांवर केवळ निवेदने देऊन न थांबता संबंधित विभागांशी संवाद साधत प्रशासनाकडून सकारात्मक निर्णय मिळविण्यासाठी डॉ. अमोल बाबू देशमुख यांनी पुढाकार घेतला. रेल्वे बॅरिकेटिंगच्या प्रश्नावर ४ नोव्हेंबरला होणारी प्रत्यक्ष पाहणी आणि बोअरवेल व विहीर साफसफाईसाठी परवानगीची प्रक्रिया स्पष्ट झाल्याने शेतकऱ्यांच्या दोन महत्त्वाच्या अडचणी दूर होण्याची आशा निर्माण झाली आहे.

प्रशासनाकडून मिळालेली आश्वासने प्रत्यक्षात उतरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, हीच आता शेतकरी वर्गाची अपेक्षा आहे. शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांसाठी एकजूट, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि योग्य समन्वय साधल्यास प्रशासनाकडूनही सकारात्मक निर्णय मिळू शकतात, हे या घडामोडींमधून अधोरेखित झाले आहे.

नागपूरमधील पराभवाची संपूर्ण जबाबदारी मी स्वीकारतो : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

- पराभवाची कारणे शोधून चुका सुधारू
- आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी आत्मचिंतनावर भर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या पराभवाची संपूर्ण जबाबदारी निवडणूक प्रभारी म्हणून मी स्वीकारतो. या निवडणुकीत पक्षाने विजयासाठी पूर्ण ताकद लावली होती. पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचून त्यांच्याशी संपर्क साधला. मात्र, अपेक्षित यश मिळू शकले नाही. निश्चितच काही ठिकाणी उणिवा राहिल्या आहेत. या उणिवा नेमक्या कुठे राहिल्या, पराभवाची कारणे काय आहेत, याचे आत्मचिंतन करून त्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करू, असे स्पष्ट प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाची जागा तशीही कॉंग्रेसकडे होती. शिवाय पुणे सुद्धा आमच्याकडे नव्हती. या दोन्ही जागा भारतीय जनता पक्षासाठी अतिशय प्रतिष्ठेच्या होत्या. या जागा आमच्याकडे नव्हत्या मात्र यावेळी त्या आमच्याकडे यायला या दृष्टीने आम्ही निवडणुकीची तयारी केली होती पण आम्ही हा पराभव स्वीकारला आहे.

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत मी स्वतः प्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळत होतो. त्यामुळे नागपूरमधील पराभवाची जबाबदारी मी स्वीकारतो. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी प्रयत्न केले नाहीत, असे म्हणता येणार नाही. सर्वांनी आपापल्या परीने मेहनत घेतली. परंतु, एवढे प्रयत्न करूनही विजय मिळाला नाही, याचा अर्थ काहीतरी कमी राहिले आहे. ती कमतरता नेमकी कुठे होती, याचा शोध घेणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदारसंघातील मतदानाचा कल, मतदारांचा प्रतिसाद आणि निवडणुकीतील विविध घडामोडींचा अभ्यास करून पराभवाची कारणे समजून



घेतली जातील, असे बावनकुळे यांनी सांगितले. काही गोष्टी शिकण्यासाठी आहेत. त्या आम्ही शिकणार आणि या चिंतनातून पुढच्या वेळेस आम्ही ही जागा जिंकू असेही त्यांनी स्पष्ट केले. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची जागा भारतीय जनता पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची होती. ही जागा जिंकण्यासाठी पक्षाने व्यापक नियोजन केले होते.

निवडणुकीच्या सुरुवाती पासूनच पक्ष संघटनेने या मतदारसंघावर विशेष लक्ष केंद्रित केले होते. पक्षाचे नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते प्रत्येक पदवीधर मतदारापर्यंत पोहचले. निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी सर्वांनी मेहनत घेतली. या पराभवाचे आत्मचिंतन करून त्याची कारणे शोधू.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातील निकाल हा पक्षासाठी आत्मपरीक्षण करण्याची संधी असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले की, निवडणुकीत विजय आणि पराभव होत असतात. मात्र, पराभवाची कारणे समजून न घेता पुढे जाणे योग्य नाही. संघटनेच्या कामकाजात कुठे सुधारणा करण्याची गरज आहे, मतदारांशी संपर्क वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करणे आवश्यक आहे आणि पदवीधर मतदारांच्या अपेक्षा काय आहेत, याचा अभ्यास केला जाईल. नागपूरच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारत असतानाच, त्यामागील संघटनात्मक आणि निवडणूक प्रक्रियेतील कारणांचा सखोल आढावा घेऊन आगामी काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार बावनकुळे यांनी व्यक्त केला.

नांदा येथे संगीतमय शिवमहापुराण कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

कीर्तनातून दिला वृक्षारोपण व जलसंधारणाचा संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

नांदा वॉर्ड क्र. ४ येथे आयोजित संगीतमय शिवमहापुराण ज्ञानयज्ञ सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे परिसरातील वातावरण सध्या हर हर महादेवाच्या जयघोषाने आणि भक्तिभावाने दुमदुमून गेले आहे. सेवानिवृत्त लाईनमन सुक्कल नवधिरे यांनी स्व रोशन नवधिरे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ या भव्य कथेचे आयोजन केले आहे. या ज्ञानयज्ञाचे कथाकार ह.भ.प. श्री केशव महाराज भुजाडे (थाटुरवाडा) यांच्या रसाळ वाणीतून होत आहे. कथा निरूपण करताना भुजाडे महाराज म्हणाले भगवान शिव हे निसर्गप्रेमी व पर्यावरण संवर्धक दैवत आहेत त्यांची खरी भक्ती निसर्गाचे रक्षण करण्यातच आहे यंदा निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे तसेच पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे कळकळीचे आवाहन त्यांनी भाविकांना केले.

या संगीतमय कथेला भावपूर्ण संगीताची साथ लाभत असून यामध्ये देवेंद्र महाराज कुसरास, हरीदास महाराज कनेरे, गजानन महाराज मुरके, आकाश महाराज कडू, सूर्यभान महाराज धुर्वे, गौरव महाराज इंगळे यांच्यासह विनोद यमदे आणि बाळू हनवते हे कलावंत साथसंगत करत आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनीता नवधिरे, प्रियंका नवधिरे यांच्यासह समस्त नवधिरे परिवार अहोरात्र परिश्रम घेत आहे. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने दररोज कथेचा लाभ घेत आहेत. दरम्यान या भव्य संगीतमय शिवमहापुराण सप्ताहाची सांगता येत्या ४ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. केशव महाराज भुजाडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने होणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

अधिकाऱ्यांचे मुख्यालय खापरखेडा, मात्र मुक्काम नागपुरात! खाजगी टॅक्सींच्या अप-डाऊनवर महानिर्मितीची लाखोंची उधळपट्टी?

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा- श्रीकांत जालंधर

खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मुख्यालयातील वास्तव्यावरून आणि त्यांच्या वाहन वापरावरून गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत,महानिर्मिती कंपनीच्या नियमानुसार अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे अपेक्षित असताना काही अधिकारी नागपुरात वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे, या अधिकाऱ्यांच्या नागपूर ते खापरखेडा दररोजच्या ये-जा करण्यासाठी खाजगी टॅक्सींचा वापर केला जात असून,त्यापोटी कंपनीकडून कंत्राटदारांना दरमहा लाखो रुपयांची बिले अदा केली जात असल्याचा आरोप आहे.

विज केंद्रातील उपमुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता यांच्यासाठी महानिर्मितीकडून खाजगी टॅक्सी वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. नियमानुसार या वाहनांचा वापर मुख्यालय, सौदामिनी कार्यालय आणि वीज केंद्र परिसरातील अधिकृत कामांसाठी अपेक्षित आहे,मात्र मुख्यालय ते कार्यालय हे अंतर जेमतेम एक किलोमीटर असतानाही काही अधिकारी नागपूर आणि आसपासच्या परिसरातून दररोज टॅक्सीने ये-जा करत असल्याचे सांगण्यात येते.



त्यामुळे कंपनीच्या वाहन वापराच्या नियमांचे पालन होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्र ते नागपूर हे येण्या-जाण्याचे अंतर जवळपास ५० किलोमीटर असताना संबंधित टॅक्सींच्या लॉगबुकमध्ये ८० ते १०० किलोमीटरपर्यंत अंतराच्या नोंदी केल्या जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. प्रत्यक्ष प्रवासापेक्षा अधिक किलोमीटर दाखवून कंत्राटदारांना वाढीव बिले अदा केली जात आहेत का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. या नोंदींची पडताळणी केल्यास वाहन वापरातील अनियमितता स्पष्ट होऊ शकते.

खापरखेडा वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत संबंधित अधिकाऱ्यांसाठी शासकीय बंगले उपलब्ध आहेत,या बंगल्यांच्या रंगरंगोटी आणि देखभालीवर लाखो रुपये खर्च केले जात असल्याचे सांगण्यात येते. मात्र, काही अधिकारी प्रत्यक्षात नागपुरात वास्तव्यास असूनही त्यांना घरभाडे भत्ता मिळत असल्याचा आरोप सूत्रांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे बंगल्यांची देखभाल, खाजगी वाहनांचा वापर आणि घरभाडे भत्ता अशा तिहेरी खर्चाचा भार महानिर्मितीवर पडत असल्याचा मुद्दा चर्चेत आला आहे.

संपूर्ण प्रकरणातील टॅक्सींची बिले,लॉगबुकमधील नोंदी अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष वास्तव्य, घरभाडे भत्ता आणि बंगल्यांच्या देखभालीवर झालेला खर्च यांची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची मागणी होत आहे. महानिर्मिती कंपनीच्या आर्थिक हिताला बाधा पोहोचत असल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी,अशी मागणीही जोर धरत आहे. या प्रकरणात वरिष्ठ प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते आणि प्रत्यक्ष चौकशी होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

बोरी(घिवारी) येथे धान कापणीला सुरुवात



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

अरोली - कोदामेंढी जिल्हा परिषद क्षेत्रातील गट ग्राम पंचायत बोरी (घिवारी) अंतर्गत येत असलेल्या बोरी (घिवारी) येथे धान कापणीला सुरुवात झालेली आहे. पंचायत समिती मौदा माजी उपसभापती तथा मौदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामनरेश शेनवार यांनी आपल्या शेतात हार्वेस्टर ने धान कापणीला सुरुवात केलेली आहे. सध्या ठोकर धानाचे भाव २५०० रुपये प्रति क्विंटल तर बारीक धानाचे भाव ४००० रुपये प्रतिक्विंटल दरम्यान असल्याचे शेनवार यांनी सांगितले.

तांडा येथे परमात्मा एक सेवक भवनात कोजागिरी उत्सव साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

अरोली - कोदामेंढी जिल्हा परिषद क्षेत्रातील गट ग्रामपंचायत तांडा अंतर्गत येणाऱ्या तांडा येथील परमात्मा एक सेवक भवनात भाजपा मौदा तालुका अ.जा. आघाडी अध्यक्ष व अरोली कोदामेंढी जिल्हा परिषद क्षेत्रातील भाजपचे भावी उमेदवार चंद्रशेखर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कोजागिरी उत्सव शांततेत साजरा करण्यात आला. याप्रसंगी परमात्मा एक सेवक मंडळाचे मार्गदर्शक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयात २ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात सोमवार, २ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात तालुका स्तरावरील तक्रार निवारण दिनात नोंदवलेल्या परंतु न सुटलेल्या तक्रारींवर व सुनावणी घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी नागरिक २ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत तक्रारींचे अर्ज सादर करू शकतील. तक्रार अर्ज दाखल केलेल्या नागरिकांनी लोकशाही दिनात प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.

तक्रार वैयक्तिक स्वरूपाची असावी तसेच नागपूर महापालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्याशी संबंधित तक्रारींसाठी त्या कार्यालयांमध्ये स्वतंत्रपणे लोकशाही दिन होत असल्याने, त्या तक्रारी संबंधित यंत्रणांकडे सादर कराव्यात, असे स्पष्ट करण्यात आले आहे. न्यायप्रविष्ट बाबी, राजस्व किंवा अपील प्रकरणे, न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित विषय, सेवा, नोकरी व आस्थापना विषयक बाबी, कार्यालय प्रमुखांनी अंतिम उत्तरे दिलेली प्रकरणे आणि आवश्यक कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नसल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिली आहे.

स्थानिक महिला उद्योजिकांसाठी 'अंकुर दीपावली बाजार'चे आयोजन

अमृत संस्था आणि महिला कला निकेतनचा संयुक्त उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्थानिक महिला उद्योजिकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच व्होकल फॉर लोकल आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला बळ देण्यासाठी अमृत (महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी) आणि महिला कला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (३१ ऑक्टोबर) विशेष अंकुर दीपावली बाजार व अमृत पेठ या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या विविध दिवाळी उपयुक्त व कलात्मक वस्तूंचे स्टॉल्स असलेले हे प्रदर्शन महिला कला निकेतन, ५८५, गिरीपेठ, नागपूर येथे भरवण्यात येत असून प्रवेश निशुल्क आहे. प्रदर्शनाची वेळ दुपारी ४ ते रात्री ९ ठेवण्यात आली आहे. सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळावे आणि महिलांच्या स्वावलंबनाला हातभार लागावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे अमृतचे नागपूर जिल्हा व्यवस्थापक आदित्य कुलकर्णी यांनी सांगितले.

या प्रदर्शनात सजावटीच्या वस्तू आकाश कंदील, आकर्षक पणत्या, बोरोसिलीकेट काचेचे दिवे, तयार रांगोळ्या, एमडीएफ, क्रोशा व मॅक्रमच्या वस्तू येथे विक्रीसाठी उपलब्ध असून विविध प्रकारची वस्त्र प्रावरणे तसेच घरगुती व आरोग्यदायी खाद्यपदार्थांच्या दालनात सुकामेव्याचे लाडू, आयुर्वेदिक उत्पादने, घरगुती चॉकलेट, उकडीचे मोदक, कटलेट तसेच धान्यांची मिश्र पिठे येथे विक्रीस असणार आहेत. नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला उद्योजिकांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

नागपूर जिल्ह्यातील १८ शहरांत उभारणार सीसीटीव्ही यंत्रणा

१३६ कोटी २९ लाखांच्या प्रकल्पाला गृह विभागाची प्रशासकीय मान्यता, काटोल, सावनेर, वडोदाचाही समावेश, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासह गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील १८ शहरांमध्ये आधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाच्या १३६ कोटी २९ लाख ९२ हजार ४३३ रुपये खर्चाच्या विस्तृत प्रकल्प अहवालाला राज्याच्या गृह विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय ३० ऑक्टोबर रोजी जारी करण्यात आला.



नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील शहरांमध्ये सीसीटीव्ही निगराणी यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव यापूर्वी तयार करण्यात आला होता. सुरुवातीला या प्रकल्पात १५ शहरांचा समावेश होता. मात्र, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार काटोल, वडोदा आणि सावनेर या आणखी तीन शहरांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे आता एकूण १८ शहरांमध्ये ही यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पात उमरेड, बुटीबोरी, कन्हान-पिपरी, रामटेक, नरखेड, कळमेश्वर, खापा, मोवाड, मौदा, भिवापूर, पारशिवनी, कुही, कांद्री, कोंढाळी, मोहपा, काटोल, वडोदा आणि सावनेर या शहरांचा समावेश आहे.

या सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणेमुळे संबंधित शहरांमधील कायदा व सुव्यवस्था राखण्यास, गुन्हेगारी प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यास तसेच गुन्ह्यांचा तपास अधिक प्रभावीपणे करण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित निगराणी यंत्रणा उभारण्याचा हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे.

नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ शहरांचा समावेश असलेला एकत्रित सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यानंतर गृह विभागाने या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली. या प्रकल्पासाठी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार मानले.

> नागपूर ग्रामीणमधील १८ शहरांतील नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शहरांच्या सुरक्षेला अधिक बळकटी देण्याचा राज्य शासनाचा हा निर्णय आहे. यामुळे नागपूर ग्रामीण जिल्ह्याची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री**

लॉयड्स मेटल्सने शांतीनगरवासीयांची ७ कोटी रुपयांची जमीन आणि सार्वजनिक रस्ता बळकावला: मीना चांद मोरपाका

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर

स्वतःच्या खासगी रुग्णालयाच्या बांधकामासाठी लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने शांतीनगर वासीयांच्या मालकीची सुमारे ७ कोटी रुपये किमतीची जमीन बळकावली, तसेच येथील सार्वजनिक रस्ता संरक्षक भिंत बांधून अडविला आणि त्याची तोडफोड केली, असा आरोप घुग्घुस नगर परिषदेतील भाजप गटनेत्या मीना चांद मोरपाका यांनी केला आहे.

याप्रकरणी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर करून त्यांनी रस्ता आणि 'भविष्यातील विकासासाठी क्षेत्र' पूर्ववत करण्याची, संबंधित कंपनीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील नगर परिषद प्रशासनाच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

मोरपाका यांनी तक्रारीत नमूद केल्यानुसार, पूर्वी लॉयड्स मेटल्सच्या मागील बाजूस ५५ हून अधिक घरे असलेली शांतीनगर वस्ती होती. कंपनीच्या विस्तारासाठी या वस्तीची जमीन आवश्यक होती. त्यामुळे तत्कालीन घुग्घुस ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधींच्या पुढाकाराने दिनांक १४ मे १९९६ रोजी लॉयड्स मेटल्स आणि शांतीनगरवासीयांमध्ये करार करण्यात आला. या करारानुसार, कंपनीने १.३८ हेक्टर जमीन खरेदी करून ती संपूर्ण जमीन प्रकल्पग्रस्त रहिवाशांमध्ये वाटप करणे अपेक्षित होते.



कंपनीने जमीन खरेदी करून त्यावर ६२ भूखंड आणि खुली जागा असलेला अभिन्यास मंजूर करून घेतला. मात्र, संपूर्ण जमीन प्रकल्पग्रस्तांना देण्याऐवजी कंपनीने संगनमताने त्यातील सुमारे २,६०० चौरस मीटर अर्थात २७,९७५ चौरस फूट जमीन मंजूर अभिन्यासात भविष्यातील विकासासाठी क्षेत्र या नावाखाली राखून ठेवल्याचा आरोप मोरपाका यांनी केला आहे.

या क्षेत्रातून चंद्रपूर मार्ग ते शांतीनगर असा रस्ता सुरुवातीला कंपनीने आणि त्यानंतर तत्कालीन घुग्घुस ग्रामपंचायतीने बांधला. आता याच भविष्यातील विकासासाठी क्षेत्र म्हणून दर्शविलेल्या जमिनीवर कंपनी स्वतःचे खासगी रुग्णालय उभारत असून, हा शांतीनगरवासीयांची जमीन बळकावण्याचा प्रकार असल्याचे मोरपाका यांनी म्हटले आहे.

भाजपच्या सत्ताकाळात तत्कालीन ग्रामपंचायतीने दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ रोजी ठराव करून या रस्त्याच्या काँक्रिटीकरणास मंजुरी दिली होती. त्यानंतर प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या निधीतून रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले.

मात्र, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील घुग्घुस नगर परिषदेने हा सार्वजनिक रस्ता बेकायदेशीरपणे अडविण्यास आणि उद्धवस्त करण्यास कंपनीला मदत केल्याचा आरोप मोरपाका यांनी केला आहे.

नगर परिषदेने दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी ठराव क्रमांक १४ पारित करून रस्त्यात बदल करण्यास परवानगी दिली होती. महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १७३(२) नुसार सार्वजनिक रस्ता कायमस्वरूपी बंद करण्याचा ठराव पारित करण्यापूर्वी सार्वजनिक पूर्वसूचना देणे, लेखी हरकती नोंदविण्यासाठी ३० दिवसांची संधी देणे आणि प्राप्त हरकतींचा विचार करणे आवश्यक आहे. मात्र, नगर परिषदेने सार्वजनिक सूचना प्रसिद्ध न करताच हा ठराव पारित केल्या. यानंतर कंपनीने संरक्षक भिंत उभारून सार्वजनिक रस्ता अडविला, रस्त्याचा काही भाग उद्धवस्त केला आणि त्या जागेचा रुग्णालयाच्या बांधकामासाठी वापर सुरू केला, असा आरोप त्यांनी केला आहे.

शांतीनगरमध्ये जाण्यासाठी शेजारच्या अभिन्यासातून दुसरा रस्ता तयार करण्यात आला आहे.

आपली चूक लक्षात आल्यानंतर नगर परिषदेने दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सार्वजनिक सूचना प्रसिद्ध केली. या सूचनेवर अमित बोरकर यांच्यासह दोघांनी हरकती नोंदविल्या. त्यानंतर दिनांक २९ जून २०२६ रोजी ठराव क्रमांक १९ पारित करण्यात आला. नगरसेवक, शांतीनगरचे रहिवासी आणि कंपनीचे प्रतिनिधी यांची बैठक घेऊन या विषयावर सर्वसाधारण सभेच्या विशेष बैठकीत निर्णय घेण्याचे या ठरावात नमूद करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर यासंदर्भात कोणताही ठराव पारित झालेला नसल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे सार्वजनिक रस्ता अडविण्यास किंवा रस्त्याच्या जागेचा रुग्णालयाच्या बांधकामासाठी वापर करण्यास कंपनीला अंतिम परवानगी मिळालेली नाही, असा दावा मोरपाका यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर कंपनीविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, सुरू असलेले बांधकाम थांबवावे, सार्वजनिक रस्ता पूर्ववत करावा आणि भविष्यातील विकासासाठी क्षेत्र म्हणून दर्शविलेली जमीन मूळ स्थितीत आणावी, अशी मागणी त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

महिला डॉक्टरांचा नवदुर्गा सन्मानपत्र देऊन गौरव

जनजागृती सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम, रुग्णसेवेतील समर्पणाचा केला सन्मान

दै. सिंहवाणी वृत्त, बदलापूर

'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या उदात्त भावनेतून रुग्णांना आरोग्यसेवा देणाऱ्या अहोरात्र तत्पर असणाऱ्या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव करत जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने नवदुर्गा सन्मानपत्र प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. नुकत्याच संपन्न झालेल्या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून बदलापूर येथील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात हा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.



महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ. केतकी गायकवाड, डॉ. प्रियांका राठोड, डॉ. प्रगती भेरे आणि डॉ. हर्षदा बिऱ्हाडे यांना आकर्षक भेटवस्तू, पेन, गुलाबपुष्प आणि नवदुर्गा सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. जनजागृती सेवा संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार, समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर यांच्या हस्ते हा सन्मान समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. स्पर्श हॉस्पिटल, बदलापूर-कर्जत-पनवेल महामार्ग परिसरातील आरोग्य आयुष्मान भारत दवाखान्यात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना दिलीप नारकर म्हणाले, डॉक्टर हा केवळ एक व्यवसाय नसून तो माणुसकीची सेवा करण्याचा पवित्र धर्म आहे. रुग्णाच्या वेदना समजून घेणे, त्याला योग्य उपचार देणे आणि त्याच्या मनात जगण्याची नवी उमेद निर्माण करणे, ही डॉक्टरांच्या कार्याची खरी महती आहे. विशेषतः महिला डॉक्टर घर, कुटुंब आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहेत. अनेकदा प्रतिकूल परिस्थितीही त्या रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असतात. त्यांच्या ज्ञानाला करुणेची जोड आणि कर्तव्याला सेवाभावाची किनार लाभलेली असते. अशा सेवाव्रती डॉक्टरांचा सन्मान करणे म्हणजे समाजातील सेवाभावी वृत्तीचा गौरव करणे होय. नवरात्रोत्सवातील नवदुर्गांच्या प्रेरणेतून या महिला डॉक्टरांच्या कार्याचा गौरव होत आहे, ही आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्यांच्या हातून अशीच निरंतर रुग्णसेवा घडत राहो आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, यश व समाधान लाभो, अशा शब्दांत त्यांनी डॉक्टरांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांना जनजागृती सेवा संस्थेच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. समाजातील विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे, हा संस्थेच्या उपक्रमांचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अप्पर आयुक्त आयूषी सिंग, प्रकल्प अधिकारी उमेश काशीद व मुख्याध्यापक नरेंद्र भाकरे यांच्या नेतृत्वात कोलीतमारा आश्रमशाळेची विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

शालेय शिक्षण क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचा वतीने २६ ऑक्टोबर २०२६ रोजी चंद्रपूर येथे पार पडलेल्या विभागीय शालेय क्रीडा वैयक्तिक गोळाफेक स्पर्धेमध्ये शाळेचा १० वीचा विद्यार्थी यश मधुकर अडमाची मु. घाटपेंढरी याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. ११.३० मी. लांब गोळा फेकून त्याने प्रथम क्रमांक पटकावला. या दैदिप्यमान यशामुळे त्याची आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, संपूर्ण परिसरातून व क्रीडा क्षेत्रातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अप्पर आयुक्त आयूषी सिंग यांचा शैक्षणिक गुणवत्तेवर व सर्वांगीण विकासावर विशेष भर असल्याने त्यांनी रात्रीचे वर्ग अभ्यास पाळ्या लावून व आकस्मिक शाळा भेटी देवून संपूर्ण आदिवासी विकास विभाग नागपूरमध्ये आपली छाप उमटविली. यावर्षी नव्याने रुजू झालेले प्रकल्प अधिकारी उमेश काशीद यांचे क्रीडा, कला, संगणक, कौशल्य विषयवृत्ती व स्वच्छता या क्षेत्रात विशेष लक्ष घालून संपूर्ण नागपूर प्रकल्पात क्रीडा, कला, संगणक, कौशल्य शिक्षकांच्या १०० टक्के नियुक्त्या करून त्यांचे व्हाट्सअप ग्रुप तयार करून प्रत्येक क्षेत्राचे आभासी सभा घेवून वेळापत्रक बनवून दिले. आदिवासी विभागाच्या क्रीडा स्पर्धेबरोबर शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या प्रत्येक स्पर्धेत भाग घेण्यास सर्व शाळांना प्रेरित केले. त्याकरिता विशेष शिबिर नागपूर येथे आयोजित केले.

त्याचाच परिणाम म्हणून क्रीडा संकुल चंद्रपूर येथे पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत विभागातील विविध शाळांमधील शेकडो खेळाडूंनी सहभाग नोंदवला असतांना अंतिम फेरीतील अत्यंत अटीतटीच्या सामन्यात यश मधुकर अडमाची याने आपले उत्कृष्ट क्रीडा कौशल्य, चपळता आणि संयमाचे प्रदर्शन घडवत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले आणि मानाचे प्रथम स्थान मिळवले. कोलीतमारा येथील एकूण ५२ विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या तालुकास्तरिय क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. त्यातील वैयक्तिक क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेल्या ८ विद्यार्थ्यापैकी ५ विद्यार्थी प्रथम येवून जिल्हास्तरीय करिता पात्र झाले. १ विद्यार्थी द्वितीय आला. साधिक ५ प्रकारात भाग घेतल्यापैकी यू-१४ खोखो मुली व यू-१७ हॅंडबॉल मुली या २ संघाने प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय करिता पात्र झाले. जिल्हास्तरावर मात्र केवळ यश आदमाची हा प्रथम आल्याने त्याची विभाग स्तराकरिता निवड झाली व त्याने आपले प्रथम क्रमांक चंद्रपूर येथील विभागीय स्परदेत कायम ठेवू राज्यस्तरीय करिता भरारी मारली.

या ऐतिहासिक यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र भाकरे, क्रीडा समन्वयक राजेंद्र बोचर, क्रीडा शिक्षक हुसेन फुलझेले तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यश अडमाची याचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. अप्पर आयुक्त, प्रकल्प अधिकारी, मुख्याध्यापक क्रीडा शिक्षक क्रीडा समन्वयक सर्व शिक्षक याचे योग्य मार्गदर्शन व सहकार्य आणि स्वतःच्या जिद्दीच्या जोरावरच हे यश संपादन करता आले, अशी भावना यावेळी यशने व्यक्त केली.

यश आगामी राज्यस्तरीय स्पर्धेत विभागाचे प्रतिनिधित्व करणार असून, तिथेही तो अशीच चमकदार कामगिरी करेल असा ठाम विश्वास असल्याचे मुख्याध्यापक नरेंद्र भाकरे यांनी मत व्यक्त केले.

तसेच अतीदुर्गम पेंच व्याघ्र प्रकल्प कोलितमारा ही पेंच नदीच्या निसर्गरम्य काठावर बसलेले असून जंगल सफारी व बोटिंग करिता प्रसीद्ध आहे. गावामध्ये १ ली ते १२ वि पर्यंत कला व विज्ञान शाखा मंजूर असून मागील ३ वर्षापासून शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत तालुक्यातून तृतीय द्वितीय तसेच प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

सुसज्ज मूलमुलींचे वसतीगृह बांधकाम पूर्णत्वास आले असून आपल्या पाल्याचा सर्वांगीण विकास, बालहक्क जोपासून गुणवत्ता व शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेची सुटीच्या दिवशी व रात्रीचे १० वाजेपर्यंत तयारी करून घ्यायची असेल तर या शाळेत आजच आपला प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन नरेंद्र भाकरे यांनी संपूर्ण पारशिवणी तालुक्यातील आदिवासी नागरिकांना केले आहे.

थोडक्यात

'दिवाळी मिलन' व 'अनोखा बाजार' १ नोव्हेंबरला

'सोबत' पालकत्व फाउंडेशनचे दोन सामाजिक उपक्रम एकाचवेळी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सोबत पालकत्व फाउंडेशनतर्फे येत्या रविवार, १ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीनगर येथील जेरिल लॉनमध्ये दिवाळी मिलन आणि अनोखा बाजार या दोन सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी आमदार संदीप जोशी यांच्या प्रेरणेतून हे उपक्रम राबविण्यात येत आहेत. नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ५.३० वाजता दिवाळी मिलन कार्यक्रमाला सुरुवात होईल. त्यानंतर त्यांच्या हस्ते अनोखा बाजारचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दोन्ही कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी संदीप जोशी राहतील. दिवाळी मिलन उपक्रमांतर्गत कोविड-१९ महामारीमुळे आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या २८९ कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात येणार आहे. फाउंडेशनने या कुटुंबांचे पालकत्व स्वीकारले असून, त्यांना यावेळी दिवाळीचा फराळ आणि रेशनचे वाटप करण्यात येणार आहे.

सायंकाळी ६ ते ९ यावेळात अनोखा बाजार भरणार आहे. या उपक्रमात दानशूर नागरिकांनी दिलेल्या सायकली, अभ्यासाची टेबले, पुस्तके, संगणक, कपाटे, घड्याळे, भांडी, खेळणी आणि कपडे अशा विविध वस्तू उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. घरात वापराविना पडून असलेल्या वस्तू गरजू व्यक्तींच्या उपयोगी याव्यात आणि त्यांना त्या सन्मानाने मिळाव्यात, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमाचे संयोजक प्रणव घुगरे व ज्योत्स्ना कुऱ्हेकर तसेच, संदीप मानकर, मंजुषा जोशी, गजानन निशितकर, आनंद टोळ, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंसी, कौशिक जोशी आणि वंदना शर्मा यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले आहे. या दोन्ही सामाजिक उपक्रमांमध्ये नागरिकांनी कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांसह सहभागी व्हावे, असे आवाहन सोबत पालकत्व फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या खुल्या एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन १ नोव्हेंबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने यंदा विदर्भस्तरीय खुली एकांकिका स्पर्धा २०२६, आयोजित करण्यात आलेली आहे. अकोल्याचे



दिवंगत रंगकर्मी राम जाधव यांच्या स्मृतीस ही एकांकिका स्पर्धा समर्पित आहे. रविवार दिनांक ०१ नोव्हेंबर २०२६ ते बुधवार दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ या काळात, दुपारी ०४ वाजतापासून या स्पर्धेची प्राथमिक फेरी, द बॉक्स, रंगमंडप परिसर, कस्तुरबा भवन, बजाज नगर नागपूर येथे संपन्न होणार आहे. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या निवडक एकांकिकांची अंतिम फेरी, मराठी रंगभूमी दिनाच्या पावन पर्वावर, म्हणजे गुरुवार दिनांक ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी, रंगमंडप परिसरातील 'द स्टेज' या नाट्यगृहात संपन्न होणार आहे. नागपूर, अकोला, वर्धा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा येथील एकूण १८ नाट्य संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धेचे उद्घाटक सुप्रसिद्ध नाट्यलेखक, दिग्दर्शक आणि समीक्षक डॉ. सतीश पावडे असून, प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री डॉ. जयश्री कापसे आहेत. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजित अध्यक्ष आहेत. ज्येष्ठ नाटककार डॉ. पराग घोंगे स्पर्धेचे संयोजक आहेत. या स्पर्धेत पांचही दिवस प्रेक्षकांना प्रवेश निःशुल्क असणार आहे. नाट्य, कला आणि साहित्य रसिकांनी या स्पर्धेस बहुसंख्येने उपस्थित राहून विदर्भ साहित्य संघाच्या या उपक्रमास भरघोस पाठिंबा द्यावा असे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीतर्फे करण्यात येत आहे.

अंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेमध्ये अग्रवाल विज्ञान महाविद्यालयाचे यश



दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा

प्रताप मेमोरियल चॅरिटेबल ट्रस्ट गोंदिया द्वारा संचलित शंकरलाल अग्रवाल विज्ञान महाविद्यालय सालेकसा येथील विद्यार्थी प्रथम मुकेश भांडारकर याने ६८ किलोग्रॅम च्या खालील वजन गटामध्ये घेण्यात आलेल्या तायक्वांदो स्पर्धे अंतर्गत रौप्य पदक प्राप्त केले आहे. ही आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धा भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती या ठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित अनेक महाविद्यालयातील खेळाडू यांनी सहभाग घेतला होता. या सर्व विद्यार्थ्यांचा पराभव करत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रौप्य पदकापर्यंत मजल मारली ही महाविद्यालयाच्या दृष्टीने एक अतिशय अभिमानाची बाब आहे. या विद्यार्थ्यांला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विशालजी अग्रवाल, सचिव प्रफुलजी अग्रवाल प्राचार्य एस नारायण मूर्ती तसेच सर्व प्राध्यापक पर्यंत आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी खूप अभिनंदन व कौतुक केले.

त्र्यंबकेश्वर मंदिर २ दिवसांसाठी बंद

नाशिक : कुंभमेळ्यानिमित्त राष्ट्रपतींसह अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यामुळे त्र्यंबकेश्वर मंदिर ३० ऑक्टोबर रोजी संपूर्ण दिवस, तसेच ३१ तारखेला सायंकाळी सहा वाजेपर्यंत भाविकांसाठी बंद राहील. केवळ स्थानिक तसेच जिल्हा प्रशासनाकडून पास मिळालेल्या भाविकांनाच दर्शन घेता येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याचे ध्वजारोहण ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यानिमित्त राष्ट्रपती, राज्यपाल यांच्यासह अतिमहत्त्वाच्या व्यक्ती त्र्यंबकेश्वर येथे येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था, गर्दी व्यवस्थापनासाठी पोलिस अधीक्षक, नगरपरिषद मुख्याधिकारी, देवस्थान ट्रस्ट सचिव यांच्या अभिप्रायानुसार मंदिर शुक्रवारी, ३० तारखेला संपूर्ण दिवस, तर ३१ तारखेला सायंकाळी ६ वाजेपर्यंत म्हणजे एकूण ४२ तास त्र्यंबकेश्वर येथील रहिवाशी वगळता इतर भाविकांसाठी बंद ठेवण्यात येईल.

महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासासाठी टाटा कॅपिटलचे सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार

शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनातून साडेपाच लाखांहून अधिक नागरिकांना लाभ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी शासनासोबत उद्योग क्षेत्राचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, जलसंधारण, अक्षय ऊर्जा आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रात सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविण्यात येणारे उपक्रम राज्याच्या विकासाला गती देणारे ठरत आहेत. टाटा कॅपिटलच्या विविध उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचित, आदिवासी, महिला आणि युवकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, टाटा कॅपिटलच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतून गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील साडेपाच लाखांहून अधिक नागरिकांना लाभ मिळाला आहे. कंपनीच्या देशभरातील एकूण सामाजिक उत्तरदायित्व खर्चापैकी सुमारे ३० टक्के खर्च महाराष्ट्रात करण्यात आला असून, देशभरात ३७ लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत विविध सुविधा पोहोचविण्यात आल्या आहेत.

शिक्षणातून उज्ज्वल भविष्याला चालना

आर्थिक परिस्थितीमुळे गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, यासाठी 'पंख शिष्यवृत्ती' उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील ६ हजार ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. पालघरमधील आदिवासी मुलींच्या उच्च शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.



आर्थिक साक्षरता कार्यक्रमांतर्गत शासकीय शाळांमधील ८५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहार आणि जबाबदारीने कर्ज घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुंबई व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि एसटीईएम विषयांमधील कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कौशल्य विकासातून रोजगाराच्या संधी

'प्रोअस्पायर' उपक्रमांतर्गत राज्यातील २६ हजारांहून अधिक युवक, महिला, आदिवासी आणि दिव्यांग व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. बँकिंग, वित्तीय सेवा, विमा, उद्योजकता आणि व्यावसायिक कौशल्यांवर भर देत रोजगार, स्वयंरोजगार आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

'आरोग्यतारा'मधून व्यापक नेत्रसेवा

'आरोग्यतारा' उपक्रमांतर्गत मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील दोन लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यावर भर देण्यात आला आहे. मोतीबिंदू, काचबिंदू, दृष्टिदोष तपासणी, उपचार आणि आवश्यक शस्त्रक्रियांसाठी नामांकित रुग्णालयांच्या सहकार्याने सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

तसेच कर्करोग प्रतिबंध, जनजागृती, प्राथमिक तपासणी आणि विशेष उपचारांसंबंधी उपक्रमांचा लाभ ३० हजारांहून अधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. यामध्ये स्तन व फुप्फुसाच्या कर्करोगाची तपासणी, गर्भाशयमुखाच्या कर्करोगाबाबत जनजागृती, वैद्यकीय उपकरणे आणि उपचारांसाठी सहाय्याचा समावेश आहे.

'जलआधार'मुळे ग्रामीण जलसुरक्षेला बळ

'जलआधार' उपक्रमांतर्गत पालघर, अहिल्यानगर आणि सातारा जिल्ह्यांतील ६० हून अधिक गावांमधील १ लाख ३० हजारपेक्षा अधिक नागरिकांसाठी जलसुरक्षा निर्माण करण्यास हातभार लागला आहे. ६०० हून अधिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले असून, दरवर्षी ८ हजार ५०० लाख लिटरपेक्षा अधिक पाणीसाठवण क्षमता निर्माण झाल्याचा अंदाज आहे. सातारा जिल्ह्यातील दहा गावांमध्ये १० हजार हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात येत असून, जलसंधारणासह शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

दुर्गम वस्त्यांमध्ये सौरऊर्जेचा प्रकाश

'द ग्रीन स्विच' उपक्रमांतर्गत पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील १९ दुर्गम वस्त्यांमधील ५८० हून अधिक वीजवंचित घरांपर्यंत सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा पोहोचविण्यात आला आहे. घरगुती वापरासह पथदिवे आणि सार्वजनिक इमारतींसाठी वीज उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्थानिक ग्राम वीज समित्यांच्या सहभागातून प्रकल्पांच्या देखभालीची व्यवस्था विकसित करण्यात आली आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी ३० हजार रोपांची लागवड

'वनारोपण फॉर न्यूट्रॅलिटी' उपक्रमांतर्गत ठाण्यातील पारसिक टेकडी परिसरात मियावाकी पद्धतीने ४० हून अधिक प्रकारच्या स्थानिक प्रजातींच्या ३० हजारांपेक्षा अधिक रोपांची लागवड करण्यात आली आहे. यामुळे जैवविविधता संवर्धन आणि शहरी हरित क्षेत्रवाढीला चालना मिळत आहे.

शिक्षणातून सक्षम विद्यार्थी, कौशल्य विकासातून रोजगारक्षम युवक, आरोग्यसेवेतून सुदृढ समाज आणि जलसंधारणातून सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्था घडविण्यासाठी शासन, उद्योग क्षेत्र व स्थानिक समुदायांचा एकत्रित सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार आहे. टाटा कॅपिटलचे हे उपक्रम सर्वसमावेशक आणि शाश्वत महाराष्ट्राच्या निर्मितीला बळ देणारे ठरत आहेत.

'संस्कृती प्रदर्शनी २०२६'चे उत्साहात उद्घाटन, नागपूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

भारतीय संस्कृती, उद्योजकता आणि सामाजिक एकात्मतेचा संगम, स्थानिक व्यावसायिकांना मिळतोय हक्काचा मंच

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय संस्कृती, परंपरा, कला, उद्योजकता आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम घडविणाऱ्या अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, नागपूर आयोजित संस्कृती प्रदर्शनी २०२६ चे उद्घाटन आज खामला रोड येथील गुलमोहर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. प्रदर्शनाच्या प्रारंभापासूनच नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. गृहउपयोगी वस्तू, विविध उत्पादने, सेवा आणि व्यावसायिक उपक्रमांना एकाच छताखाली उपलब्ध करून देणाऱ्या या प्रदर्शनाला नागपूरकरांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

शुक्रवार, ३० ऑक्टोबर ते रविवार, १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन निवृत्त फ्लाइट लेफ्टनंट शिवाली देशपांडे, सचिव, प्रहार समाज जागृती संस्था, नागपूर आणि डॉ. चैतन्य शेंबेकर, अध्यक्ष व



संचालक, ओमेगा हॉस्पिटल, नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात लघुउद्योजक, महिला उद्योजक, स्थानिक व्यावसायिक आणि विविध सेवा क्षेत्रांतील घटकांना आपल्या उत्पादनांची व सेवांची ओळख अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यासपीठाची आवश्यकता असते. ह्यासंस्कृती प्रदर्शनी २०२६ह्याच माध्यमातून अशा व्यावसायिकांना ग्राहकांशी थेट संवाद साधण्याची, आपल्या उत्पादनांचे सादरीकरण करण्याची आणि व्यवसायाच्या नव्या संधी निर्माण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

विशेषतः महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे, स्थानिक व्यवसायांना चालना देणे आणि स्वावलंबनाची भावना अधिक बळकट करणे, या दृष्टीने अशा प्रदर्शनांचे महत्त्व अधोरेखित होते. केवळ खरेदी-विक्रीपुरते मर्यादित न राहता, विविध व्यावसायिकांना परस्परांशी जोडणारे आणि ग्राहकांना नवनवीन उत्पादनांची माहिती देणारे व्यासपीठ म्हणूनही हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करताना आधुनिक व्यावसायिक संधींना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या प्रदर्शनातून करण्यात आला आहे. विविध स्टॉल्स, गृहउपयोगी वस्तू, उत्पादने, सेवा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध पर्याय अनुभवता येत आहेत. कुटुंबीयांसह भेट देण्यासाठी उपयुक्त ठरणारे हे प्रदर्शन नागरिकांसाठी खरेदीसोबतच नव्या व्यावसायिक संकल्पना जाणून घेण्याची संधीही उपलब्ध करून देत आहे.

संस्कृती प्रदर्शनी २०२६ हे प्रदर्शन ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान दररोज सकाळी ११ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुले राहणार आहे. प्रदर्शनासाठी प्रवेश विनामूल्य असून, नागपूरकरांनी कुटुंबीय आणि मित्रपरिवारासह भेट देऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या आयोजनासाठी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे संयोजक व उपाध्यक्ष अंकुश हरकरे, अध्यक्ष पराग जोशी, महिला आघाडी प्रमुख ध्येया चासकर, व्यापारी आघाडी प्रमुख मंदार चिखलीकर, सहसंयोजक स्वरा करंजगावकर आणि समीर आचार्य यांच्यासह आयोजन मंडळाचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

देशातील ६० टक्के डेटा सेंटर एकट्या महाराष्ट्रात

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रात ८५ ते १२५ च्या दरम्यान डेटा सेंटर आहेत. अदानी-अंबानींना यासाठी फुकटात जमिनी देण्यात आल्या आहेत. या डेटा सेंटरसाठी लाखो लिटर पाण्याची गरज असते. आमचा डेटा सेंटरला विरोध नाही, मात्र सर्वसामान्य लोकांच्या पिण्याच्या



पाण्याची सोय करावी लागेल. हे मोठ्या लोकांचे चोचले आता बंद झाले पाहिजेत. देशातील ६० टक्के डेटा सेंटर एकट्या महाराष्ट्रात आहेत. तर सरकारने पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे आणि नवीन डेटा सेंटरवर बंदी आणावी, ही गोष्ट आम्ही सरकारच्या लक्षात आणून देणार आहोत असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रात जंगलतोडीचे काम जोरात सुरू आहे.

भीमाशंकर परिसरातील जंगलावर घाला घातल्यानंतर आता रायगडमधील जंगलांवरही संकट आले आहे. १५०० मेगावॅट क्षमतेच्या अदानी यांच्या प्रस्तावित वीज प्रकल्पासाठी सुमारे १५ हजार झाडे तोडली जाणार आहेत. स्थानिक ग्रामस्थ आणि विश्वस्तांना विश्वासात न घेता प्रकल्पासाठी जागा देण्यात आली आहे. सह्याद्री पर्वतरांग ही महाराष्ट्राची नैसर्गिक ढाल आहे. येथील जंगलामुळे पर्यावरणीय संतुलन टिकून आहे. वन्यजीवांचे अधिवास नष्ट करून नेमके काय साध्य करायचे आहे? उद्योगपतींच्या फायद्यासाठी महाराष्ट्राची नैसर्गिक संपत्ती नष्ट करू नका.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ पडला असून येत्या काळात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. यापूर्वी कधीही या वेळेस इतक्या मोठ्या प्रमाणावर पाण्याचे टँकर सुरू झाले नव्हते, पण आता राज्यात मोठ्या प्रमाणावर टँकर सुरू करावे लागत आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या शहरात दाखल झाली पहिली एआय रोबोटिक टिचर!

विद्यार्थ्यांना देणार आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान, पूजनीय गोळवलकर गुरुजी एआय पब्लिक स्कूलमध्ये अनोखा उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राला आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर नेण्याच्या दिशेने प्रयत्नशील असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर शहरात आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून शिक्षणाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. पूजनीय गोळवलकर गुरुजी अक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये राज्यातील पहिली अक टिचर 'वेदांती' दाखल झाली असून, तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने



अभ्यंकरनगर येथील या शाळेत अक - रोबोटिक्स लॅबची स्थापना करण्यात आली आहे. या लॅबचे उद्घाटन शुक्रवारी करण्यात आले.

या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल दहिफळे उपस्थित होते. वावेळी सुनील खानखोजे, शुभांगी फुटाणे , ललित तपासे, मोहन साठे, गुणवंत अभ्यंकर, भारतीय विद्या प्रसारक संस्थेचे रमेश बक्षी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. वंदना बडवाईक यांची मंचावर उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते फीत कापून एआय- रोबोटिक्स लॅबचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी लॅबची पाहणी करून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रयोगांचे कौतुक केले. या लॅबमधील अक शिक्षिका 'वेदांती' हिने मान्यवरांशी विचारलेल्या विविध प्रश्नांना अचूक उत्तरे देत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रयोग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्याधारित शिक्षण देणे हा या लॅबचा मुख्य उद्देश असल्याचे डॉ. वंदना बडवाईक यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

ही केवळ नागपुरातीलच नव्हे, तर संपूर्ण विदर्भातील पहिली अक आधारित लॅब असल्याचे नमूद करून अनिल दहिफळे म्हणाले की, नागपुरातील विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात आणणे, समस्यांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधणे आणि भविष्यातील तंत्रज्ञानाच्या आव्हानांसाठी स्वतःला सज्ज करणे ही काळाची गरज आहे.

अध्यक्षीय भाषणात रमेश बक्षी यांनी एआय या संक्षिप्त शब्दाचा अर्थ केवळ 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' नसून 'ऑलटाइम इंटेलिजेंट' असाही असल्याचे सांगितले. शाळेतील प्रत्येक विद्यार्थी बुद्धिमान व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. पांडुरंग खानखोजे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली परसबाग, गणिताचे बाग, दिवाळीनिमित्त बनविलेले आकाशकंदील आणि शुभेच्छापत्रांचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. एआय - रोबोटिक्स लॅबच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या डॉ. वंदना बडवाईक, यश आणि स्नेहल यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अश्विनी देशमुख यांनी केले.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
७ दिनांक : शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

राष्ट्रीय एकता : एकात्मिक भावनेची प्रेरणा तथा प्रोत्साहन

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली



राष्ट्रीय एकता दिवस दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनानिमित्त पाळला जातो, ज्यांनी स्वतंत्र भारताच्या एकत्रिकरणात महत्त्वाची भूमिका बजावली होती. सरदार पटेल यांनी विविध संस्थानांचे विलिनीकरण करून भारताला एकसंध बनवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले, ज्यामुळे भारतीय एकता आणि अखंडतेची नींव बळकट झाली.

राष्ट्रीय एकता दिनाचा उद्देश देशातील विविधता असताना देखील आपली एकता जपण्याची भावना बळकट करणे आहे. या निमित्ताने शाळा, महाविद्यालये आणि सरकारी संस्था विविध उपक्रम राबवतात, ज्यामध्ये रन फॉर यूनिटीसारख्या मॅरेथॉन, शपथविधी, आणि चर्चासत्रे यांचा समावेश होतो. हा दिवस लोकांना देशाच्या एकात्मतेचे महत्त्व पटवून देतो आणि देशप्रेमाची भावना वृद्धिंगत करतो. राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयाने देशाच्या एकात्मतेसाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा करावी, असे आवाहन केले जाते, जेणेकरून आपला देश शांती, प्रगती आणि ऐक्याच्या मार्गावर पुढे जाऊ शकेल. भारतात दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय एकता दिनः इतिहास आणि निमित्तः हा दिवस भारताचे 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. भारत सरकारने सन २०१४ पासून हा दिवस अधिकृतपणे 'राष्ट्रीय एकता दिन' म्हणून घोषित केला.

सरदार पटेलांचे योगदानः स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारतातील ५६५ पेक्षा जास्त संस्थाने (रियासती) भारतीय संघराज्यात विलीन करून एकात्म व अखंड भारताची स्थापना केली. त्यामुळे त्यांना 'भारताच्या एकीकरणाचे शिल्पकार' मानले जाते.

उद्देशः देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतीच्या लोकांमध्ये बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती आणि अखंडता टिकवून ठेवणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

प्रमुख उपक्रमः (१) रन फॉर युनिटी : राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी देशभरात मॅरेथॉन किंवा एकता दौडचे आयोजन केले जाते.

(२) प्रतिज्ञा : शासकीय कार्यालये आणि शाळांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली जाते.

(३) स्टॅच्यू ऑफ युनिटीः गुजरात येथील नर्मदा नदीच्या किनारी सरदार पटेलांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' (उंची १८२ मीटर) हा जगातील सर्वात उंच पुतळा उभारण्यात आला असून, तिथे विशेष कार्यक्रम होतात.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय एकता दिवस संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने आणि जल्लोषाने साजरा केला जातो. समाजातील सर्व स्तरांतील लोकांना सहभागी करून घेण्यासाठी विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. काही सर्वात सामान्य राष्ट्रीय एकता दिवस उपक्रमांमध्ये हे समाविष्ट आहेत.

एकतेसाठी धावः एकतेसाठी धाव हा राष्ट्रीय एकता दिवशी आयोजित केला जाणारा एक लोकप्रिय कार्यक्रम आहे, ज्यामध्ये सर्व वयोगटातील लोक एकता आणि अखंडतेची भावना साजरी करण्यासाठी मॅरेथॉनमध्ये सहभागी होतात. ही धाव राष्ट्रीया एकीकरणाचे प्रतीक आहे आणि सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली वाहते.

शपथविधी समारंभः शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये शपथविधी समारंभ आयोजित केले जातात, ज्यात सहभागी एकता आणि अखंडतेची मूल्ये जपण्याची शपथ घेतात. ही शपथ दैनंदिन जीवनात या आदर्शांचे महत्त्व अधोरेखित करते.

निबंध आणि भाषण स्पर्धाः शैक्षणिक संस्था अनेकदा निबंध आणि भाषण स्पर्धा आयोजित करतात, ज्यात विद्यार्थी एकता आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्याविषयी आपले विचार व्यक्त करतात. राष्ट्रीय एकता दिवस हा असा दिवस आहे, ज्या दिवशी आपण त्यांच्या योगदानाचा सन्मान केला पाहिजे आणि या स्पर्धांच्या माध्यमातून विविधतेतील एकतेचा संदेश पसरवला पाहिजे.

सांस्कृतिक कार्यक्रमः भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेचा उत्सव साजरा करण्यासाठी, नृत्य, संगीत आणि पारंपरिक कलांचा समावेश असलेले सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. विविधता हीच भारताची शक्ती आहे, या विचाराला हे कार्यक्रम प्रोत्साहन देतात.

सामुदायिक सेवा उपक्रमः रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम आणि गरजू लोकांना भोजन देणे यांसारखे अनेक स्वयंसेवा उपक्रम हाती घेतले जातात. हे उपक्रम लोकांना समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देण्यास प्रोत्साहित करतात.

पुष्पहार अर्पणः सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक संस्थांसह विविध ठिकाणी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यांना आणि चित्रांना लोक पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतात.

प्रश्नमंजुषा स्पर्धाः भारताला एकसंध करण्यात सरदार पटेलांच्या भूमिकेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी शैक्षणिक संस्था अनेकदा विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करतात. आपण ट्विटर आणि इंस्टाग्राम स्टोरीजच्या माध्यमातून सोशल मीडियावरही या महत्त्वाच्या दिवसाबद्दल जागरूकता निर्माण करू शकतो. प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यासाठी इंस्टाग्राम स्टोरीजचा वापर करू शकतो.

आपल्या फॉलोअर्सना "राष्ट्रीय एकता दिवस कधी साजरा केला जातो?, भारतात राष्ट्रीय एकता दिवस कोणत्या तारखेला साजरा केला जातो?, राष्ट्रीय एकता दिवस कोणाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो?, राष्ट्रीय एकता दिवस का साजरा केला जातो?" असे प्रश्न विचारु या. असे केल्याने त्यांना केवळ या महान व्यक्तीबद्दल आणि त्यांच्या योगदानाबद्दल माहितीच मिळणार नाही, तर या दिवसाबद्दल जागरूकता देखील निर्माण होईल. आपण राष्ट्रीय एकता दिनाची अर्थपूर्ण घोषणा शेअर करण्यासाठी पूर्वीचे ट्विटर सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर देखील करू शकतो.

राष्ट्रीय एकता दिवसाची शपथः शपथविधी सोहळ्या दरम्यान सहभागींद्वारे म्हटली जाणारी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ, एकता आणि अखंडतेप्रती असलेल्या वचनबद्धतेवर भर देते. ही शपथ राष्ट्राची एकता आणि सुरक्षा टिकवून ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकावर आहे याची आठवण करून देते.

राष्ट्रीय एकता दिवस घोषवाक्यः घोषवाक्ये राष्ट्रीय एकता दिवसाचे सार आणि उद्देश व्यक्त करतात. ती लोकांना एकत्र येऊन एकतेची भावना साजरी करण्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन देतात. आपण राष्ट्रीय एकता दिवसासाठी घोषवाक्य म्हणू शकतो आणि आपल्या मित्र व कुटुंबीयांनाही तसे करण्यास प्रोत्साहित करू शकतो.

- ९६९९८३६७१७

राष्ट्रीय एकात्मतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल!

प्रवीण टाके
छ. संभाजीनगर



भारताची विविधता हीच भारताची ताकद आहे. भाषा वेगवेगळ्या, संस्कृती वेगवेगळ्या, परंपरा वेगवेगळ्या; धर्म वेगवेगळे मात्र देश एक आहे. ही एकात्मता केवळ भावनिक पातळीवर टिकवून ठेवायची नसते, तर त्यासाठी दूरदृष्टी, संघटन कौशल्य, बंधुता, निर्णयक्षमता आणि प्रसंगी कठोर भूमिका घेण्याची तयारीही आवश्यक असते. भारताच्या इतिहासात या गुणांचा प्रभावी प्रत्यय देणारे नेतृत्व म्हणजे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल. म्हणूनच त्यांची जयंती ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकता दिवसाची सुरुवात कधी झाली

भारत सरकारने २०१४ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. २२ ऑक्टोबर २०१४ रोजी केंद्र शासनाने या निर्णयाची घोषणा केली. त्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या आयोजनासंदर्भात अधिकृत प्रसिद्धिपत्रक जारी केले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी पहिला राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी एका आदेशाद्वारे त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करताना राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्याचे निर्देशित केले आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध, नाटीका, व्याख्याने, आयोजित करण्याचे स्पष्ट केले आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान आणि स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलीनीकरण करून भारताची एकात्मता दृढ करण्यासाठी केलेले ऐतिहासिक कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश होता. या दिवशी रन फॉर युनिटी, राष्ट्रीय एकतेची शपथ आणि संचलन यांसारख्या उपक्रमांद्वारे देशाची एकता, विश्वासाची पावती होती.

जनसेवेपासून स्वातंत्र्यलढ्यापर्यंत

अहमदाबाद नगरपालिकेतील त्यांच्या कार्यातून प्रशासनाकडे पाहण्याची व्यावहारिक दृष्टी दिसून आली. शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्यावर त्यांनी भर दिला. सार्वजनिक पद म्हणजे अधिकार गाजवण्याचे साधन नसून, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कामातून दिसतो. पुढे या अहमदाबाद नगर पालिकेचा अध्यक्ष देशाचा लोहपुरुष म्हणून नावलौकिकास आला.

१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत आणि १९४२ च्या भारत छोडो आंदोलनातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्य लढ्यातील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. संघटनकौशल्य, निर्णयक्षमता आणि जनतेला एकत्र आणण्याची क्षमता या गुणांच्या बळावर ते राष्ट्रीय चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक बनले.

स्वातंत्र्यानंतरची ऐतिहासिक जबाबदारी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण स्वातंत्र्य मिळाले म्हणजे देशाची राजकीय एकात्मता पूर्ण झाली, असे नव्हते. त्या वेळी ब्रिटिश भारताबरोबरच ५६० हून अधिक संस्थाने अस्तित्वात होती. ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर या संस्थानांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला. अनेक संस्थानांचे स्वतंत्र राहण्याचे किंवा भारत-पाकिस्तान यापैकी एखाद्या देशात सामील होण्याचे पर्याय विचाराधीन होते. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय विभाजन टाळणे, हे नव्या नेतृत्वापुढील मोठे आव्हान होते.

स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री म्हणून सरदार पटेल यांनी संस्थानांच्या विलीनीकरणाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. व्ही. पी. मेनन यांच्यासारख्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने त्यांनी संस्थानिकांशी चर्चा, समजूत, मुत्सद्देगिरी आणि परिस्थितीनुसार ठाम प्रशासकीय निर्णय यांचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वामुळे विविध संस्थाने भारतीय संघराज्यात सामील होण्याची प्रक्रिया पुढे गेली. हे काम केवळ राजकीय करारांचे नव्हते; भारताच्या भविष्यातील भौगोलिक अखंडतेचा आणि प्रशासनाच्या स्थैर्याचा तो पाया होता.

जुनागढ आणि हैदराबाद : निर्णयक्षमतेची कसोटी

जुनागढच्या संस्थानाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताच्या भौगोलिक आणि राजकीय हितांचा विचार करून पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. पुढे हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरला. वाटाघाटी आणि प्रयत्नांनंतरही प्रश्न सुटत नसल्याने सप्टेंबर १९४८ मध्ये ऑपरेशन पोलो ही पोलीस कारवाई करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या विलीनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. या घटनांमधून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नावर त्यांनी मुत्सद्देगिरीसोबतच आवश्यक तेव्हा कठोर निर्णय घेण्याची तयारीही दाखवली.

संस्थानांच्या विलीनीकरणा बरोबरच स्वतंत्र भारताची प्रशासकीय चौकट सक्षम करण्यावरही पटेल यांनी भर दिला. अखिल भारतीय सेवांचा बळकटीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. देशाच्या विविध भागांत प्रशासनाची सातत्यपूर्ण आणि समन्वयित यंत्रणा कार्यरत राहणे, हे राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती.

एकसंघ भारताची पायाभरणी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर भारतासमोर केवळ परकीय सत्तेतून मुक्त होण्याचे आव्हान नव्हते; तर अनेक संस्थाने, विविध राजकीय हितसंबंध आणि अनिश्चित भविष्य यांना एकाच राष्ट्रीय चौकटीत आणण्याचेही आव्हान होते. अशा निर्णायक काळात सरदार वल्लभभाई पटेल यांनी दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, धैर्य आणि ठाम निर्णयक्षमतेच्या बळावर संस्थानांच्या विलीनीकरणाला गती दिली.

त्यामुळे आधुनिक भारताच्या राजकीय एकात्मतेचा पाया अधिक भक्कम झाला. आज आपण एकसंध भारताचे नागरिक म्हणून अभिमानाने उभे आहोत, त्या ऐतिहासिक प्रक्रियेत सरदार पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. म्हणूनच त्यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करणे, हा इतिहासाचा गौरव करण्याबरोबरच भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षितता जपण्याच्या संकल्पाचे नूतनीकरण करण्याचा दिवस आहे.

- उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

देशाचे पोलादी व्यक्तीमत्व, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

रमेश लांजेवार
नागपूर

गुजरातमधील नडियाद येथे ३१ ऑक्टोबर १८७५ ला सरदार वल्लभभाई पटेल नावाचा पोलादी लोहपुरुष जन्माला आला आणि भारतीय राजकारणात एक पोलादी धारदार व्यक्तीमत्व उदयास आले. कारण त्यांनी देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला एकसंधीकरण करण्यात मोलाचे योगदान दिले त्यामुळेच त्यांना लोहपुरुष व सरदार ही सर्वोच्च मानाची उपाधी मिळाली. पटेलांनी गुजरातच्या खेडा,आनंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील संपूर्ण ग्रामवासियांना संघटित करून त्यांनी इंग्रज अत्याचाराच्या विरूद्ध मोठा लढा उभारून सत्याग्रह केला.

या सत्याग्रहानंतर प्रभावशाली नेता म्हणून गुजरातसह संपूर्ण भारतात त्यांची गणना होवू लागली. अशा परिस्थितीत त्यांनी मागे फिरून न पहाता एक पाऊल पुढे टाकून स्वतंत्र पूर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात मोलाची भुमिका बजावली व इंग्रजांशी लोहा घेण्याची शपथ घेतली.आज आपण त्यांच्या कामांचे अनुकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.आपण त्यांची १५१ वी जयंती साजरी करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आजचा राजकीय पुढारी देशासाठी काय-काय करू शकतात त्यावर नजर टाकने अत्यंत गरजेचे आहे.कारण वल्लभभाई पटेल यांनी कठोर परिश्रमाने आणि मोठ्या शिताफीने भारत पाकिस्तान फाळणी नंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतता स्थापन करण्यासाठी मोठी मोलाची भुमिका बजावली व हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून घेणे हे भारतासाठी महान आणि मोलाचे कार्य पटेलांनी केले. हे कार्य जोपर्यंत सुर्य-चंद्र,आकाश-पाताळ आहे तोपर्यंत कोणीही विसरणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यांच्यातील मुत्सद्देगिरी, गंभीर परिणाम संपूर्ण देशातील सर्वसामान्यांवर होतांना आपण पहातो. आज देशातील वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे कठीण केले आहे.बेरोगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे, महागडे शिक्षण यामुळे विद्यार्थी वर्ग त्रस्त आहे, आरोग्य सुविधांचा अभाव, शेतकऱ्यांचा गंभीर प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष हा संपूर्ण प्रकार देशातील राजकीय पुढाऱ्यांच्या चुकांमुळे निर्माण झालेली गंभीर समस्या आहे.आज देशातील प्रत्येक राजकीय पुढारी करोडपती आहे व कृषिप्रधान देशाचा शेतकरी आत्महत्यां करीत आहे याकडे कोन्हीही लक्ष देण्यास तयार नाही. अशी गंभीर परिस्थिती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतंत्र भारताची करून ठेवली आहे.मी देशातील आजी-माजी आमदार-खासदार, लोकप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांना विनंती करतो की, आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या पुर्वजांचे अनुकरण करून देशहिताचे कार्य करावे व सर्वसामान्यांच्या समस्यांकडे जातीने लक्ष द्यावे.

लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करतांना राजकीय पुढारी, प्रशासन, सामाजिक संघटना यांनी त्यांची आठवण म्हणून आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून जयंती साजरी करावी. कारण बदलते हवामान व अलनिनोचा वाढता प्रभाव यामुळे निर्माण होणारे प्रदुषण यावर आळा घालण्याचे काम वृक्षलागवडीच्या माध्यमातूनच होवू शकते. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर हि आठवण निरंतर काळापर्यंत राहील व प्रत्येक झाडात,पाणात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे अनुकरण होईलच सोबतच दर्शन सुध्दा होईल. सरदार वल्लभभाई पटेलांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन. जय हिंद!

- ९९२१६९०७७९